फक्त शासकीय उपयोगासाठी

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## ठाणे जिल्हयातील
## महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी
## विकास महामंडळ कार्यान्वित
## गवत एकाधिकार खरेदी योजना (१९८७-८८)
## मूल्यांकन पहाणी अहवाल

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
महाराष्ट्र राज्य पुणे-४११००१.

१९८८-८९

फक्त शासकीय उपयोगासाठी

# महाराष्ट्र शासन

## ठाणे जिल्ह्यातील
## महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी
## विकास महामंडळ कार्यान्वित
## गवत एकाधिकार खरेदी योजना (१९८७-८८)
## मूल्यांकन पहाणी अहवाल

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
महाराष्ट्र राज्य पुणे-४११००१.

१९८८-८९

<u>प्रस्तावना</u>

ठाणे जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाकडून सन १९८५-८६ पासून महाराष्ट्र शासन पुरस्कृत, गवत एकाधिकार खरेदी योजना राबविली जात आहे. ही योजना आदिवासी कुटुंबांना आर्थिकदृष्ट्या लाभदायक ठरली आहे. परंतु ही योजना राबवित असतांना आदिवासी महामंडळास सन १९८७-८८ मध्ये फार मोठ्या प्रमाणात नुकसानीची झळ पोहोचली. त्यामुळे शासन व आदिवासी महामंडळापुढे असा प्रश्न निर्माण झाला की, ही योजना चालू ठेवावी किंवा बंद का करावी ? चालू ठेवावयाची असल्यास ती कोणत्या स्वरूपात चालू ठेवावी? त्यात काय बदल घडवून आणावा ? या प्रश्नाचा उकल होण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाने या संस्थेला या योजनेचा मूल्यांकन अभ्यास करण्याच्या सूचना दिल्या . शासनाच्या या सूचनेनुसार संस्थेने हे काम हाती घेऊन ते पूर्ण केले.

पाहणीत या योजनेतील लाभार्थींची, विविध स्तरावर काम करणाऱ्या कर्मचा-यांची व अधिका-यांची, संचालक मंडळातील काही संचालकांची व व्यापारी मंडळीची या योजनेसंबंधी मते अजमावण्यात आली. संस्थेने महामंडळाच्या कागदपत्रावरून, सभेच्या इतिवृत्तांवरून माहिती संकलित केली. तसेच लाभार्थींची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचीही या योजनेसंबंधी मते जाणून घेतली. लाभार्थींच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा पहाणीत थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. आदिवासींमध्ये कायम स्वरूपाचा आर्थिक बदल घडवून आणण्यासाठी काय करणे उचित राहील याबाबत काही तज्ञांची, स्वयंसेवी संस्थांची मते विचारात घेण्यात आली. या माहितीवर आधारित हा अहवाल तयार करण्यात आला आहे.

सदर मूल्यांकन पाहण्याचे काम संस्थेचे उपसंचालक, श्री. गो. भागुराणा यांच्याकडे सोपविण्यात आले होते. त्यांनी हे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले.

श्री. व. पं. देवळे, संशोधन अधिकारी, श्री. जि. भा. अवचट, सांख्यिकी सहाय्यक, श्री. उ. मा. यादव, आरेखक यांनी मोठ्या परिश्रमाने क्षेत्रीय काम पूर्ण करून माहितीचे संकलन व पृथ:करण केले.

हा मूल्यांकन अहवाल, महाराष्ट्र शासनाला, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास मंडळाला तसेच या योजनेशी निगडीत असलेल्या शासनाच्या विविध स्तरांवर काम करणाऱ्या अधिकारी वर्गाला व संशोधकांना माहितीचा व मार्गदर्शक ठरेल अशी मला आशा आहे.

[डॉ. गोविंद गारे]
संचालक
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य,
पुणे-४११ ००१

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक पासुन | पृष्ठ क्रमांक पर्यंत |
| --- | --- | --- | --- |
| १] | ठाणे जिल्हयातील गवत एकाधिकार खरेदी क्षेत्राची पार्श्वभूमि. | १ | १५ |
| २] | महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ ध्येये व उद्दिष्टये व गवत एकाधिकार खरेदी योजनेत महामंडळाचे स्थान. | १६ | २४ |
| ३] | मुल्यांकन पाहणीचा उद्देश, कार्यपध्दती व मुल्यांकनाच्या मर्यादा | २५ | ३० |
| ४] | १९८७-८८ वर्षात गवत एकाधिकार खरेदी योजना तोटयात कां? [कारण मिमांसा] | ३१ | ५१ |
| ५] | एकाधिकार गवत खरेदी योजना १९८७-८८ अंदोजित झालेले नुकसान | ५२ | ६२ |
| ६] | पाहणीत आढळलेल्या सहृश्य बाबींचे समालोचन | ६३ | ९० |
| ७] | पाहणीतील निष्कर्ष व शिफारसी | ९१ | ११५ |


## परिशिष्टे


| | | | |
| --- | --- | --- | --- |
| १] | प्रपत्र क्र. १ लाभधारकांची माहिती | ११६ | १२० |
| २] | प्रपत्र क्र. २ गवत एकाधिकार खरेदी योजनेत सहभाग असलेल्या कर्मचारी व अधिका-यांसाठी प्रश्नावली | १२१ | १२२ |


---

## प्रकरण १ ले

### ठाणे जिल्हयातील गवत एकाधिकार खरेदी विभागाची पार्श्वभूमि

१.१ भौगोलिक रचना :-

ठाणे जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या पश्चिमेस आहे. या जिल्हयाच्या दक्षिणेस मुंबई हे जागतिक कितीचे मोठे शहर, व्यापारी केंद्र, औद्योगिक केंद्र व महाराष्ट्र राज्याचे राजधानीचे ठिकाण आहे. ठाणे जिल्हयाच्या उत्तरेस गुजरात राज्य, पश्चिमेस अरबी, समुद्र त्याच्या पूर्वेस नाशिक व दक्षिणेस रायगड जिल्हे आहेत.

ठाणे जिल्हा मुंबईसारख्या जगप्रसिध्द शहराला लागून असला तरी या जिल्हयाची अविकसित जिल्हयामध्येच गणना होते. त्याची कारणे अनेक आहेत त्यातील महत्वाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

१] या जिल्हयाचा बराचसा मोठा भाग डोंगराळ व जंगलमय आहे.

२] जिल्हयाच्या समावेश कोकण पट्टीत होतो. जिल्हयात सर्वत्र भरपुर पाऊस पडतो. परंतु डोंगर उतारावर पावसाचे पाणी जमिनीत टिकून रहात नाही. उन्हाळयात पिण्याच्या पाण्याचे सुध्दा दुर्भिक्ष असते.

३] शेती कांही ठिकाणी सुरमाड तर काही ठिकाणी मध्यम प्रतीची आहे. भात, नागली, वरई ही या भागातील पिके बागाईत क्षेत्राचे प्रमाण जवळ जवळ ८ टक्के येवढे आहे. त्यामुळे शेती या भागाचा मुख्य व्यवसाय असलातरी लोकांना शेतीपासुन बारमाही उद्योगधंदा मिळत नाही. त्यामुळे ब-याचशा लोकांना उदरनिर्वाहासाठी जवळच्या मुंबई शहराकडे धाव घ्यावी लागते. काहींना कायम स्वरुपी काम मिळते तर काहींना हंगामी स्वरुपात काम मिळते.

एकंदरीत येथील रहाणा-या लोकांचे जीवनमान, आर्थिक स्थिती सामान्या दर्जाची आहे.

४. ठाणे शहाराच्या जवळच्या भाग सोडून दिला तर जव्हार, मोखाडा, डहाणू, वाडा, मुरबाड, शहापूर , पालघर वसई हया तालुक्यातील आतील भागात वहातुकीच्या सोयी फार थोडया आहेत. पावसाळ्यात काही दिवस ओढे, नाल्यामुळे दहातुक विस्कळीतच होते.

१. २ लोकसंख्या :-

ठाणे जिल्हयाची एकूण लोकसंख्या ११५.९५ लाख असली तरी ग्रामिण लोकसंख्या फक्त ३३.५२ लाख आहे. ही ग्रामिण लोकसंख्या १३ तालुक्यात विखुरलेली आहे. ग्रामिण भागात ७.२९ लाख आदिवासींची वस्ती आहे. महाराष्ट्र राज्यात धुळे जिल्हयाच्या खालोखाल आदिवासी लोकसंख्या असलेला जिल्हा ठाणे आहे. ठाणे जिल्हयातील ७.२९ लाख आदिवासींपैकी ६.५८ लाख आदिवासी ठाणे , उल्हासनगर, व कल्याण तालुके वगळून राहिलेल्या १० तालुक्यात बहुसंख्येने आढळतात. त्यामुळे ठाणे जिल्हयातील जव्हार, मोखाडा, तलासरी, वाडा, डहाणू व शहापूर या ६ तालुक्यांचा पूर्णत: व पालघर , वसई भिवंडी व मुरबाड या ४ तालुक्यांचा अंशत: अनुसूचित क्षेत्रात किंवा मुख्य आदिवासी उपयोजना क्षेत्रात समावेश करण्यात आलेला आहे. हे आदीवासी उपयोजना क्षेत्र २ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांमध्ये समाविष्ट करण्यांत आलेले आहेत.

१. ३ आदिवासी उपयोजना :-

या आदिवासी उपयोजना क्षेत्रात समाविष्ट असलेल्या गावांची

संख्या व त्या भागातरहाणाऱ्या एकूण व आदिवासी लोकसंख्येची माहिती खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र. १.१

ठाणे जिल्ह्यात आदिवासी उपयोजना क्षेत्रात समाविष्ट असलेली गांवे व लोकसंख्या.

| अ. न. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे नांव | तालुके | समाविष्ट गावे व शहरे | तालुक्याची समाविष्ट लोकसंख्या [शेकड्यात] एकूण | आदिवासी | उपयोजनेत पूर्णतः किंवा भागशः समाविष्ट |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १] | जव्हार | १. डहाणू | १६४[२] | २,२२,०४९ | १,४५,९८४ | पूर्ण तालुका समाविष्ट. |
| | | २. तलासरी | २७ | ६६,९१३ | ६०,८६३ | -"- |
| | | ३. मोखाडा | ७९ | ६४,२४० | ५९,५७० | -"- |
| | | ४. जव्हार | १२३[१] | १.०९,२६४ | ९४,३०७ | -"- |
| | | ५. वाडा | १६८[१] | ९५,५३० | ४८,८६३ | -"- |
| | | एकूण | ५६१[४] | ५,५७,९९६ | ४.०९,५८७ | |
| २] | शहापूर | ६. शहापूर | २०९[१] | १,७१,७३३ | ५३,८३३ | पूर्ण तालुका समाविष्ट |
| | | ७. पालघर | १६५ | १.४४,५३५ | ७६,८३९ | भागशः तालुका समाविष्ट |
| | | ८. वसई | ५१ | ६५,२२० | ३१,८८० | -"- |
| | | ९.] भिवंडी | ७३ | ४३,१५७ | १६,०३५ | -"- |
| | | १०. मुरबाड | ७७ | ४८,१०९ | १७,००४ | -"- |
| | | एकूण | ५७५[१] | ४.७२,७५४ | १.९५,५९१ | |
| | | जिल्हा एकूण | ११३६[५] | १०,३०,७५० | ६,०५,१७८ | |

वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ग्रामिण भागातील २/३ आदिवासी, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार यांच्या कार्यक्षेत्रात आहेत. व त्यातील आदिवासींच्या लोकसंख्येचे प्रमाण ७३.४० टक्के आहे.

## १.४ आदिवासींच्या विकासाचे प्रयत्न :-

महाराष्ट्र शासनाने ठाणे जिल्ह्यातील वरील १० तालुक्यांचा समावेश आदिवासी उपयोजनेत १९७६ पासून करुन या भागाच्या व येथील आदिवासींच्या विकासासाठी अनेक योजना चालू केलेल्या आहेत.

आदिवासींची व्यापारी-यांकडून होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. हे महामंडळ आदिवासी उपयोजना क्षेत्रातील गांवात आदिवासींनी उत्पादीत केलेला शेती माल व गवत चांगला भाव देऊन खरेदी करते. त्यामुळे या भागात रहाणा-या आदिवासींची वजन, माप व भावापासून होणारी फसवणूक कमी झाली आहे. आदिवासींना त्यांच्या उपासमारीच्या वेळी खावटी कर्जाची व्यवस्था केली आहे.

या भागात गवताचे उत्पन्न चांगले येते. बरेचसे मजूर गवत कापून जवळच्या मोठ्या गावात विकून आपला कसा तरी उदरनिर्वाह करतात., असे शासनाच्या नजरेत आले. या गवत विक्रीतही बरेचसे व्यापारी आदिवासींना त्यांचा माल घेताना वजनात व भावात फसवत असत. याच सुमारास काही भागात अवर्षणामुळे दुष्काळ पडण्याचे शासनाच्या दृष्टिस आहे. या दुष्काळी भागात चा-याअभावी तडफडणा-या गुरांना वाचविण्यासाठी चारा पुरविण्याचे गरजेचे भासू लागले.

हा दुहेरी हेतू साध्य करण्याच्या इराद्याने शासनाने, महामंडळास शासनाचे प्रतिनिधी म्हणून १९७९-८० मध्ये या भागातून गवत खरेदी करुन दुष्काळी भागास पुरविण्याच्या सूचना दिल्या. महामंडळाने १९७९-८० व १९८०-८१ मध्ये हे काम केले. परंतु महामंडळाकडे पुरेशी यंत्रणा व आर्थिक बल नसल्यामुळे हे काम १९८४-८५ पर्यंत स्थगित केले होते. महामंडळाने हे काम १९८५-८६ या वर्षापासून पुन्हा हाती घेतले. महामंडळास १९८५-८६ व १९८६-८७ मध्ये या योजनेचा लाभ मिळाल्यामुळे व या भागातील आदिवासींना जास्तीत जास्त लाभ व्हावा या उद्देशाने ही योजना ठाणे जिल्ह्यातील ६ तालुक्यात विस्तारीत करण्यात आली. ह्या ६ तालुक्यांपैकी जव्हार, मोखाडा, तलासरी, वाडा व डहाणू या ५ संपूर्ण तालुक्यातून व पालघर मधील . . . उपयोजना क्षेत्रातील गावांपासून गवत खरेदी करण्यासाठी १९८७-८८ या वर्षात ११० खरेदी केंद्रे सुरु केली. ह्या भागात महामंडळाने एकाधिकार पध्दतीने गवत खरेदी केले. या ११० खरेदी केंद्राव्यतिरिक्त २ खरेदी केंद्रे शहापूर तालुक्यात ऐच्छिक तत्वावर सुरु केली होती.

या भागाची पार्श्वभूमि लक्षात येण्याच्या दृष्टिने या भागाची काही आकडेवारी मांडणे योग्य ठरेल.

गवत एकाधिकार खरेदी योजनेखाली समाविष्ट असलेल्या क्षेत्राची व कुटुंबांची माहिती खालील तक्त्यात देण्यात येत आहे.

## तक्ता क्र. १.२

गवत एकाधिकार खरेदी योजनेतील समाविष्ट क्षेत्र व कुटुंबे

| अ. न. | तालुक्याचे नांव | तालुक्याचे क्षेत्र [चौ. कि. मी] | समाविष्ट गावांची संख्या | समाविष्ट गावातील कुटुंबांची संख्या – एकूण | समाविष्ट गावातील कुटुंबांची संख्या – आदिवासी | बिगर आदिवासी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १] | डहाणू | ९६६.५ | १६४ | ३१०४२ | २१६५४ | ९३८८ |
| २] | तलासरी | २६७.२ | २७ | ८९०८ | ७८६६ | १०४२ |
| ३] | मोखाडा | ६८४.५ | ७९ | १०६५२ | ९७७३ | ८७९ |
| ४] | जव्हार | ८४४.३ | १२३ | १६९९६ | १५५५० | १४४६ |
| ५] | वाडा | ७७५.० | १६८ | १२७०८ | ६५५६ | ६१५२ |
| ६] | पालघर | ७१९.० | १६५ | २०३०३ | १२२९४ | ८००९ |
| | एकूण | ४२५६.५ | ७२६ | १००६०९ | ७३६९३ | २६९१६ |

आधार – बेंचमार्क सर्व्हे पाहणी [ १९८० ]

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, गवत एकाधिकार खरेदी योजनेचा फायदा ठाणे जिल्हयातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ६ तालुक्यांना झालेला असून त्यातील ७२६ गावांतील जवळपास ७३,६९३ आदिवासी कुटुंबे, २६,९१६ बिगर आदिवासी कुटुंबे अशा एकूण १००६०९ कुटुंबांना लाभ मिळालेला आहे. या योजनेमुळे जवळ जवळ ४००० चौ. कि. मी. क्षेत्रातील वाया जाणारे गवत गोळा केले जाते. या भागातील लोकांना या योजनेमुळे आर्थिक सहाय्य उपलब्ध झालेले आहे.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने घेतलेल्या बेंचमार्क पहाणीत मिळालेली या भागाची जमातीनिहाय आदिवासी लोकसंख्या खालील प्रमाणे आहे.

तक्ता क्र. १.३.

गवत एकाधिकार खरेदी योजनेखालील गावातील जमातीनिहाय आदिवासी कुटूंबे व लोकसंख्या

| अ.क्र. | जमातीचे नांव | कुटूंबांची संख्या | एकूण लोकसंख्या | एकूण आदिवासी लोकसंख्येशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १] | वारली | ४९,६६२ | २,७८,५७० | ४९.३४ |
| २] | कोळी मल्हार | १६,७१२ | ९३,९३५ | १६.६४ |
| ३] | ठाकूर | १३,६०८ | ७०,४१८ | १२.४७ |
| ४] | कातकरी | ८,३५४ | ३९,२६९ | ६.९५ |
| ५] | कोंकणा | ६,२२९ | ३७,६९३ | ६.६८ |
| ६] | कोळी महादेव | ४,९२८ | २७,१२९ | ४.८० |
| ७] | इतर | ३.२८३ | १७,६०३ | ३.१२ |
| | एकूण | १,०२,७७६ | ५,६४,६१७ | १००.०० |

वरील तक्त्यातवरून असे दिसते की, गवत एकाधिकार खरेदी [योजना] क्षेत्रांत प्रामुख्याने वारली, कोळी मल्हार, ठाकूर, कातकरी, कोंकणा, व महादेव कोळी या जमाती आढळतात. या जमातीमध्ये कातकरी, ठाकूर वारली या मागासवर्गीय [ Primitive ] जमातींचा समावेश आहे. या आदिम जमातींना या योजनेचा विशेष फायदा होत आहे.

१.५ भागाची साक्षरता :-

यात तालुक्यातील एकूण ग्रामीण लोकसंख्या [१९८१ जनगणनेप्रमाणे] ७,७४,५२७ आहे. त्यातील साक्षरांची संख्या २,२७,५६१ इतकी आहे. या भागातील साक्षरतेचे प्रमाण २९.३८ टक्के येते. हे या जिल्ह्यातील साक्षरतेच्या मानाने व महाराष्ट्रातील साक्षरतेच्या मानाने फारच कमी आहे.

ठाणे जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत गवत एकाधिकार खरेदी योजने खाली समाविष्ट जमिनीच्या क्षेत्राचे वापरानुसार वर्गीकरण खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

तक्ता क्र. १.४

वापरानुसार जमिनीचे वर्गीकरण

| अ. न. | जमिनीचे वर्गीकरण | क्षेत्र [हेक्टरमध्ये] | एकूण भौगोलिक क्षेत्राशी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | निव्वळ पिकाखालील क्षेत्र | १,२४,५९४ | ३०.८४ |
| २] | चालू पड | ११,२६३ | २.७७ |
| ३] | लागवडी लायक पण पडीत | २२,००० | ५.४० |
| ४] | जुनी पड | १०,३९८ | २.५५ |
| ५] | शेती व्यतिरिक्त इतर बाबींसाठी उपयोगात आणलेली जमिन | १८,२३१ | ४.४८ |
| ६] | पडीक व शेतीस निरुपयोगी | १८,६५७ | ४.५८ |
| ७] | कायम गुरचरण व गुरचरणाखालील क्षेत्र | १३,३५८ | ४.२८ |
| ८] | जंगल | १,८१,२७८ | ४४.५२ |
| ९] | झाडे, झुडपे गवत व कुरणाखालील क्षेत्र | ४,४३१ | १.०८ |
| १०] | एकूण क्षेत्र | ४,०७,२१० | १००.०० |
| ११] | दुहेरी पिकाखालील क्षेत्र | १,०७,५९९ | --- |

वरील बाबींवरुन खालील गोष्टी निदर्शनास येतात.

१] गवत एकाधिकार खरेदी योजनेचे भौगोलिक क्षेत्रफळ जवळपास ४००० चौ. कि. मी. आहे. म्हणजे ४००० चौ. किमी क्षेत्रातून या योजनेखाली गवत गोळा केले जाते. ही योजना राबविण्याचे क्षेत्र तुलनात्मक दृष्टया व केंद्राणेच्या तुलनेने बरेच मोठे आहे.

२] या भौगोलिक क्षेत्रफळापैकी १८१३ चौ. कि. मी. म्हणजे ४५ टक्के क्षेत्र जंगलाखाली आहे.

३] राहिलेल्या जंगल क्षेत्राव्यतिरिक्त क्षेत्रातही झाले, झुडपे गवत व कायम गुरचरणाखाली असलेल्या क्षेत्रांत गवताखाली चांगले क्षेत्र आहे.

४] निव्वळ पिकाखालील क्षेत्राचा विचार केला तर भौगोलिक क्षेत्राच्या फक्त ३१ टक्के क्षेत्र लागवडीखाली आहे.

याबाबत अधिक खुलासेवार माहिती सोबत जोडलेल्या तक्ता क्र. १.५ ते. १.९ मध्ये दिलेली आहे.

५] तक्ता क्र. १.६, प्रमुख पिकांची आवडेवारी दर्शविणा-या तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, एकूण अन्नधान्य क्षेत्रापैकी ६७ टक्के क्षेत्र भाताखाली आहे. १५ टक्के क्षेत्र वरई पिकाखाली आहे. व ७ टक्के क्षेत्र नाचणी पिकाखाली आहे. भाजीपाला व फळबागे खालील क्षेत्र फक्त अनुक्रमे १७५६ व ३७१ हेक्टर आहे. भाजीपाला व फळबागेखालील क्षेत्र एकूण पिकाखालील क्षेत्राच्या जवळ जवळ २ टक्के आहे. ते फार कमी आहे. भाजीपाला व फळबाग क्षेत्राला या भागात बराच वाव आहे. मुंबई सारखी बाजारपेठ, रस्ते, व नैसर्गिक अनुकुल हवामान भाजीपाला, वनशेती व फळबागांसाठी पुरक बाबी आहेत.

६] तक्ता क्र. १७, निव्वळ सिंचनाखाली क्षेत्र दर्शविणाऱ्या तक्त्यावरुन असे आढळते की, एकूण / निव्वळ पिक क्षेत्राच्या ३.१६ टक्के क्षेत्र/फक्त सिंचनाखाली आहे. त्यापैकी विहीर बागायतीखाली क्षेत्र ३०४१ हेक्टर आहे. हे एकूण सिंचन [illegible] क्षेत्राच्या ७७ टक्के आहे.

७] या भागातील प्रमुख पशुधन म्हणजे बैल, गायी, म्हशी व बकऱ्या ही होत. त्यामुळे दुग्ध व्यवसायाला या भागात वाव आहे.

# तक्ता क्र. १.५

ठाणे जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत गवत एकाधिकार खरेदी योजनेखालील जमिनीच्या क्षेत्राचे वापरानुसार तालुकानिहाय वर्गीकरण

[ क्षेत्रफळ हेक्टरमध्ये ]

| तालुका | निव्वळ पिका खालील क्षेत्र | चालूपड | लागवडीस योग्य पण पडीक जमिन | एकूण लागवडी योग्य क्षेत्र | जूनीपड | बिनशेती खालील उपयोगात असलेली जमिन | पडीक व शेतील निरूपयोगी | कायम गुरचरण व चराऊ क्षेत्र | जंगल | झाडेझुडपे गवत व कुरणा- खालील क्षेत्र | एकूण भौगो- लिक क्षेत्र | दुहेरी पिका खालील क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १] डहाणू | २५३०० | २१०० | ६०० | २८००० | ५१०० | २८०० | ४४०० | ८६०० | ४६७८० | – | ९५६८० | २५६०० |
| २] तलासरी | १४९०० | – | १०० | १५००० | – | १३०० | ६१० | – | ७९०० | – | २४८१० | १५००० |
| ३] मोखाडा | १८४०० | २००० | २००० | २२४०० | २४०० | ९६०० | ४४३० | – | २३९०० | – | ६२७३० | १८४०० |
| ४] जव्हार | २६४०० | ४८०० | १०९०० | ४२१०० | १३०० | ३०० | ५०२२ | २४०० | २८४३८ | – | ७९५६० | २६५०० |
| ५] वाडा | २०८०० | १२०० | ५३०० | २८००० | ६०० | ५०० | १६६९ | – | ३०४६१ | ४३०० | ७२५३० | २०९०० |
| ६] पालघार | १९७९४ | ४६३ | ३१०० | २३३५७ | ९९८ | ३७३१ | २५२६ | ४३५८ | ३६७९९ | १३१ | ७१९०० | ११९९ |
| एकूण | १२५५९४ | ११२६३ | २२००० | १५८८५७ | १०३९८ | १८२३१ | १८६५७ | १५३५८ | १८१२७८ | ४४३१ | ४०७२१० | १०७५९९ |
| भौगोलीक शेकडा प्रमाण | ३०.८४ | २.७७ | ५.४० | ३९.०१ | २.५८ | ४.४८ | ४.५८ | ३.७७ | ४४.५२ | १.०९ | १००.०० | २६.४२ |

तक्ता क्र. १.६

बँच पाहणीप्रमाणे [१९८० ची ] ठाणे जिल्ह्यातील प्रमुख पिकांची आकडेवारी दर्शविणारा तक्ता

[हेक्टर मध्ये ]

| अ.क्र. | तालुका | भात | गहू | ज्वारी | रागी [वरई] | वारली [तावा] | एकूण कडधान्ये | एकूण डाळी | एकूण अन्न धान्य | अन्न-धान्या-शिवाय इतर | भाजी पाला | फळे | इतर अन्न धान्ये | एकूण पिके |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १] | डहाणू | १५५३९ | २४ | २२५ | १२३० | २०१ | १७४४३ | ९६५ | १८४०८ | ५७८८ | २६१ | १०६ | ७६८ | २५६०० |
| २] | तलासरी | ५६४३ | - | ११९ | ४३६ | - | ६४२६ | ७०१ | ७१२७ | ७१२३ | ३१४ | ६७ | १३९ | १५००० |
| ३] | मोखाडा | २८५२ | ८४२ | १०३३ | ५९८३ | २२२२ | १३६५२ | २३३८ | १५९९० | १३८५ | १०९ | १२ | ३७७ | १८४०० |
| ४] | जव्हार | ८२६४ | १० | ३६५ | ६५८५ | ४२२८ | १९५०१ | २६९७ | २२१९८ | ३४३१ | २४७ | ५६ | १५२ | २६५०० |
| ५] | वाडा | १२५५३ | ७३ | १२ | ५५६ | ३ | १३३७५ | १०१२ | १४३८७ | ६०९६ | २३२ | ३० | ४५ | २०९०० |
| ६] | पालघर | १९४९३ | ८२ | २६ | ५२ | ४ | १७९४३ | १७८९ | १९७३२ | ५० | ६९३ | ११० | १८१ | २०९९३ |
| | एकूण | ६३३४४ | १०३१ | १७८० | १४८४२ | ६६५८ | ८८३४० | ९५०२ | ९७८४२ | २३७८३ | १७५६ | ३७१ | १६६२ | १२७३२३ |
| | शेकडा प्रमाण | ६३.७२ | १.०५ | १.८२ | १५.१७ | ६.८० | ९०.२९ | ९.७१ | १००.०० | x | x | x | x | x |

तक्ता क्र. १.७

ठाणे जिल्ह्यातील बेंचमार्क पाहणीप्रमाणे [१९८० च्या] निव्वळ सिंचनाखालील क्षेत्र [विहीरी, बंधारा, तळी, उपसा जलसिंचन योजना व इतर साधनांपासून ] दर्शविणारा तक्ता

[ क्षेत्र हेक्टरमध्ये]

| अ. नं. | तालुका | विहिरी | | विविध साधनांपासून जलसिंचना | | | | | | | | कालव्याखालील निव्वळ भिजणारे क्षेत्र | एकूण निव्वळ भिजणारे क्षेत्र | सिंचनाखालील निव्वळ क्षेत्राची एकूण सिंचनाखालील क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | जलसिंचनाखालील निव्वळ क्षेत्र | बंधारा | | इतर साधने | | तळी | | उपसा-जल | | | | |
| | | | | संख्या | जलसिंचनाखालील निव्वळ क्षेत्र | संख्या | जल-सिंचनाखालील निव्वळ क्षेत्र | संख्या | सिंचनाखालील निव्वळ क्षेत्र | संख्या | जल-सिंचनाखालील निव्वळ क्षेत्र | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १] | डहाणू | २१० | १८०३ | २६ | २ | ७ | २५४ | २८ | ३० | - | - | - | २०९६ | ८.२८ |
| २] | तलासरी | ३१५ | ४०५ | १ | ४९ | १ | १९३ | ८ | ३५ | ४ | १६० | - | ८४२ | ५.६५ |
| ३] | मोखाडा | ५९ | २५ | -- | -- | २ | ५ | १ | ५ | - | - | - | ३४ | ०.१८ |
| ४] | जव्हार | १४ | १० | - | - | १ | २५७ | - | - | - | - | - | २६२ | १.०१ |
| ५] | वाडा | १४७ | ७७ | ५ | १६ | ८ | २९२ | १२ | ४ | ६ | ३४ | - | ४३३ | २.०८ |
| ६] | पालघर | ४८७ | ७२१ | १३ | २१ | १ | ३९ | १५ | २४ | - | - | - | ३०५ | ४.०७ |
| | एकूण | १२३२ | ३०४१ | ४५ | ९५ | २० | १०४० | ५९ | ९७ | १० | २०४ | - | ३९७२ | ३.१६ |

## तक्ता क्र. १.८

ठाणे जिल्हयातील बँचमार्क पाहणी १९८० प्रमाणे गणना केलेल्या पशुधनाची संख्या दर्शविणारा तक्ता

{ पशुधन - १९७२]

उपलब्ध असलेल्या पशुधनाची संख्या

| अ. क्र. | तालुक्याचे नांव | बैल | गाई | म्हशी | बकरे | मेंढ्या | डुकरे | इतर | एकूण पशुधन | कुक्कुटपालन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १] | डहाणू | ३७, १८० | २९, ६६५ | ६, ८९९ | १९, ७११ | ४४ | ३३८ | ४०१ | ९४, १३८ | १, ००, ४९१ |
| २] | तलासरी | १२, ५९९ | १२, ०५२ | २, ३०५ | ७, ८५२ | १६५ | ६ | ११ | ३४, ९९० | ४२, १६६ |
| ३] | मोखाडा | १९, ५२२ | १८, ८८६ | १, ८४० | १३, ३६५ | - | - | १८ | ५३, ६३१ | ३३, २०५ |
| ४] | जव्हार | ३१, ५०५ | २५, ७५७ | ५, ४८८ | १९, ४०१ | - | - | ५२ | ८२, २०३ | ६५, १५० |
| ५] | वाडा | २०, ५२२ | १८, २०२ | १२, ७३९ | १०, २०६ | १०९ | २३१ | ६० | ६२, ०६९ | ५४, ०३३ |
| ६] | पालघर | १४, ३९६ | ११, ७३८ | [illegible] | १०, ८५० | ५ | २७ | २१, २६८ | ६३, ४१० | ७०, ४१६ |
| | एकूण | १, ३५, ७२४ | १, १६, २०० | ३४, ३९७ | ८१, ३८५ | ३२३ | ६०२ | २१, ८१० | ३, ९०, ४४१ | ३, ६५, ४६१ |

<u>तक्ता क्र. १.९</u>

ठाणे जिल्ह्यामध्ये घेतलेल्या बेंचमार्क सर्व्हेक्षण १९८० प्रमाणे शासन एकाधिकार खरेदी क्षेत्रामधील आदिवासींची शैक्षणिक प्रगति दर्शविणारा तक्ता

| क्रमांक | तालुक्याचे नांव | विविध शैक्षणिक पातळीपर्यंत शिक्षण घेतलेल्या संख्या | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राथमिक म्हणजे इयत्ता ४ थी पर्यंत | इयत्ता ४ थी पास | इयत्ता १० वी पास अथवा त्याबरोबरीचे | पदवीधारक | पदविकाधारक | इतर | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १] | डहाणू | ३८६ | ३९७ | २६६ | ५६ | ४ | १ | १०९० |
| २] | तलासरी | १९९ | ३९४ | १२३ | १८ | २ | – | ६४६ |
| ३] | मोखाडा | ३६ | २४४ | ४७ | २ | – | – | ३२९ |
| ४] | जव्हार | ८८ | २८२ | ४९ | २ | – | – | ४६१ |
| ५] | वाडा | ९४ | १०१ | ११६ | २८ | – | २ | ३४१ |
| ६] | पालघर | ३३८ | ९१२ | ५०८ | १४१ | २ | १ | १९०२ |
| | एकूण | ११२१ | २ २४० | ११४९ | २४७ | ८ | ४ | ४७६९ |

# प्रकरण २ रे

## महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ ध्येये व उद्दिष्टये व गवत एकाधिकार खरेदी योजनेत महामंडळाचे स्थान

२.१ **प्रस्तावना :-**

" आदिवासी " हा आपल्या समाजातील आर्थिक व सामाजिकदृष्टया अतिदुर्बल घटक आहे. या दुर्बल घटकांच्या विकासाची जबाबदारी भारतीय घटनेमध्ये केलेल्या तरतुदीनुसार शासनाने स्विकारलेली आहे. त्यांच्या विकासासाठी मध्यवर्ती शासन व राज्य शासन बहुविध योजना राबवित आहे.

आदिवासी समाज अतिशय अशिक्षित, अज्ञानी, अंधश्रध्दाळू, तसेच सर्व दृष्टीने मागासलेला आहे. परंतु तेवढाच तो प्रामाणिक आहे. तो दुर्गम व डोंगराळ भागात वास्तव्य करतो आदिवासींच्या अज्ञानाचा मागासलेपणाचा त्यांच्या आर्थिक दुर्बलतेचा फायदा घेऊन व्यापारी जमीनदार, सावकार आदीकडून आदिवासींची या ना त्या स्वरुपात आर्थिक पिळवणूक होत असते. ही आदिवासींची होत असलेली आर्थिक पिळवणूक नाहीशी करण्यासाठी प्रभावी साधन म्हणून कार्य करण्याच्या प्रमुख उद्देशाने महाराष्ट्र शासनाने " महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची " १९७२ मध्ये सहकारी संस्था कायद्याखाली स्थापना केली.

२.२ **आदिवासी महामंडळाची ध्येये व उद्दिष्टये :-**

आदिवासी महामंडळाची प्रमुख उद्दिष्टये खालील प्रमाणे आहेत.

१ ] आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शेती, जंगल व इतर उत्पादीत मालाची खरेदी व विक्री करणे.

२ ] शासन, सार्वजनिक संस्था, अगर महामंडळे ह्यांच्या वतीने प्रतिनिधी [एजंट] म्हणून काम करणे तसेच आदिवासी विकासाशी निगडीत कामे हाती घेणे.

३ ] आदिवासींचा विकास व्हावा, म्हणून शासनाने सोपविलेले कोणतेही काम हाती घेणे.

४ ] सर्व साधारणपणे सर्व आदिवासींना , भूमिहिनांना रोजगार मिळेल, असा कार्यक्रम हाती घेणे व त्याला उत्तेजन देणे.

५ ] संलग्न संस्थांच्या व्यापार व बाजार यांच्या व्यवस्थेत समन्वय साधणे.

६ ] संलग्न संस्थाकरिता मध्यवर्ती खरेदीदार व विक्रेता म्हणून काम करणे.

२. ३ आदिवासी विकास महामंडळ राबवित असलेल्या सद्य योजना :-

महाराष्ट्र राज्यात आदिवासी महामंडळ हल्ली खालील प्रमाणे योजना राबवित आहे.

१ ] शेती व गौण जंगल मालाची एकाधिकार व आधारभूत किंमत योजनांतर्गत खरेदी करणे.

२ ] आदिवासींसाठी खावटी कर्ज योजना

३ ] आदिवासी शेतक-यांना शेतीच्या विकासासाठी विजपंप व ऑईल इंजिन्सचा पुरवठा.

४] प्रकल्प अधिकाऱ्याकडून राबविली जाणारी केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना [ न्युक्लिअस बजेट अंतर्गत योजना ] राबविणे.

५] शासकीय आश्रमशाळांना दैनंदिन आवश्यक वस्तूंचा पुरवठा करणे.

६] आदिवासींना नित्योपयोगी वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ग्राहक भांडारे व प्राथमिक आरोग्य केंद्रे चालविणे.

७] आदिवासी उमेदवारांना, शासन, निमशासकीय संस्थेत सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सेवायोजना केंद्र चालविणे.

वरील योजनांपैकी पहिली योजना ही अतिशय महत्त्वाची व आदिवासींच्या फायद्याची व हिताची योजना आहे. ही योजना राबविण्याचे काम महामंडळाकडे सोपविण्यात आले आहे.

२.४ <u>महाराष्ट्र आदिवासी आर्थिक स्थिती सुधारणा कायदा-१९७६ :-</u>

महाराष्ट्र विधी मंडळाने सन १९७६ मध्ये महाराष्ट्र आदिवासी आर्थिक स्थिती [सुधारणा] कायदा लागू केला आहे. या कायद्याचे तरतुदीनुसार विनिर्दिष्ट क्षेत्रात म्हणजे [आदिवासी उपयोजना क्षेत्रात ] शासनाने अधिकृत केलेल्या संस्थेव्यतिरिक्त इतर कोणत्याही खाजगी व्यक्तीला आदिवासीकडून त्याचा शेती माल व गौण वनउपज विकत घेणे आणि आदिवासींना कर्जपुरवठा करणे यावर बंदी आणली आहे. सन १९७७-७८ सालापासून आदिवासी विकास महामंडळास महाराष्ट्र शासनाने आदिवासींचा शेतीमाल व जंगलमाल खरेदी करण्यासाठी मुख्य अभिकर्ता म्हणून नियुक्त केले आहे.

२.५ एकाधिकार खरेदी कार्यक्षेत्र :-

एकाधिकार खरेदी योजना महाराष्ट्र राज्यात काही भागात लागू करण्यात आलेली आहे. ही योजना आता आदिवासी उपयोजनेतील ६२ तालुक्यात लागू आहे. शासनाने प्रथमत: सन १९७७-७८ मध्ये महाराष्ट्रातील फक्त ७ तालुक्यात एकाधिकार आणि आधारभूत किंमत खरेदी योजना पथदर्शक पध्दतीने सुरु केली. या योजनेस आदिवासींचा मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन १९७८-७९ या वर्षातही ही योजना चालू ठेवण्यात आली.

आज सर्वसामान्या आदिवासींना त्यांचे शेती माल व गौण उत्पादनास योग्य भाव मिळतो. वजन सुध्दा बरोबर होते. केंद्रावरच पैसे मिळतात. लहान व्यापारी व सावकार यांच्या शोषणापासून आदिवासींचे संरक्षण व्हावयास सुरुवात झाली आहे.

१९८७-८८ मध्ये ही योजना उप अभिकर्ता असलेल्या २५६ आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या ४९० धान्य व गौण बनौपजके व ११० गवत खरेदी केंद्रांमार्फत राबविली गेली आहे. आदिवासी महामंडळाची महाराष्ट्रात एकूण ९ प्रादेशिक कार्यालये आहेत. या १९८७-८८ वर्षात महामंडळाने १८,१७,३७२ क्विंटल माल खरेदी केला होता. त्याची किंमत जवळ जवळ रु. २६.७६ कोटी एवढी होती.

२.६ आदिवासी महामंडळाच्या योजना :- आदिवासी सहकारी संस्था व सहकारी बँक :- संबंध व कार्यदिशा

महामंडळ राबवित असलेल्या विविध योजनामध्ये एकाधिकार

आणि आधारभूत खरेदी योजना ही महत्त्वाची योजना आहे. सदर योजनेअंतर्गत निर्देशित शेती व जंगलमालाचे दर संबंधित जिल्हाधिकारी नजिकच्या प्रमुख कृषिउत्पन्न बाजार समितीतील दरावरुन ठरवितात. त्याप्रमाणे मालाची किंमत महामंडळाच्या खरेदी विक्री केंद्रावरच रोख अदा करण्यांत येते.

निर्देशित मालाची खरेदीची व्यवस्था आदिवासी सेवा सहकारी संस्था तसेच ज्या ठिकाणी सदर संस्था कार्यरत नसतील त्या ठिकाणी महामंडळाचे खरेदी केंद्रामार्फत हे व्यवहार सुरळीत करण्यांत आलेले आहेत. संस्थांना खरेदी संबंधी कमिशन [सूट] स्वरुपात मोबदला देण्यांत येतो. खरेदी केलेल्या मालाच्या किंमतीच्या हुंडया, जिल्हा सहकारी बँकेमार्फत वटवून खरेदीसाठी पैसा पुरविला जातो. खरेदी व्यवहारासाठी लागणारा निधी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई यांनी राज्य शासनाचे थकहमी पोटी नजर गहाण कर्जाचे रुपाने महामंडळास उपलब्ध करुन दिलेला आहे. सदरच्या कर्जाची परतफेड ही खरेदी केलेला माल विकून करण्यात येते. प्रामुख्याने येथे असे नमूद करावेसे वाटते की, आदिवासी विकास महामंडळ ही नुसती व्यापारी संस्था नसून आदिवासी विकासाचे ते एक प्रभावी साधन आहे. त्यामुळे महामंडळाचा व व्यापारी संस्थांच्या दृष्टिकोनात फार फरक आहे. व्यापारी संस्था नफ्याच्या दृष्टीकोनातूनच पहातील. परंतु महामंडळाला तसे पाहून चालणार नाही. त्यामुळे महामंडळाला ब-याचवेळी तोटयाची झळ सहन करावी लागते. व त्याची भरपाई शासनाकडून होते. महामंडळास शासनाकडून प्रामुख्याने काही बाबींवर आर्थिक सहाय्य प्राप्त होते.

२.७ महामंडळास आर्थिक सहाय्य :-

१] तोटा भरपाई अनुदान.

२] खरेदी अनुदान.

३] व्यवस्थापकीय अनुदान.

४] एकाधिकार गवत खरेदीसाठी केंद्र शासन सहाय्य.

सन १९८७-८८ या वर्षात आदिवासी महामंडळाला खालील प्रमाणे अनुदान व सहाय्य मिळाले आहे.

| अ.नं. | तपशील | रक्कम [लाखात] |
|---|---|---|
| १] | तोटा भरपाई अनुदान | ३२.१८ |
| २] | खरेदी अनुदान | १७०.६५ |
| ३] | व्यवस्थापकीय अनुदान | २८५.५८ |
| ४] | एकाधिकार गवत खरेदीसाठी केंद्राचे सहाय्य. | १४०.०० |
| | एकूण | ६२८.४१ |

२.८ महामंडळाच्या कामावर देखरेखीसाठी व मार्गदर्शनासाठी संचालक मंडळ:-

आदिवासी महामंडळाचे काम करण्यासाठी व देखरेख ठेवण्यासाठी व त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यासाठी एक संचालक

मंडळाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांचे २३ सभासद आहेत. या संचालक मंडळाची महिन्यातून कमीत कमी एकदा तरी सभा होते. त्यात महामंडळाच्या कामाचा आढावा घेतला जातो व पुढे महामंडळाला मार्गदर्शन केले जाते.

२. ९ कार्यकारी समिती - आदिवासी महामंडळाचे कार्यक्षेत्र :-

आदिवासी महामंडळाचे मुख्य कार्यालय, नाशिक येथे आहे. व्यवस्थापकीय संचालक हे व्यवस्थापन विभागाचे प्रमुख आहेत. महामंडळ एकाधिकार खरेदीने १७ शेतीमालाची उत्पादने आणि गवतासह ६ वन गौण उत्पादन आदिवासी उपयोजना क्षेत्रात निर्देशीत भागातून खरेदी करते. हे सर्व पदार्थ जिल्हाधिकारी यांनी ठरवून दिलेल्या दराने खरेदी करुन महामंडळ विक्री करीत असते. गौण वन उत्पादनामध्ये गवताला प्रमुखस्थान आहे. संचालक मंडळ प्रत्येक वर्षी ११ किंवा ११ हून अधिक सभासदांची कार्यकारी समितीसाठी नियुक्त करते आणि मंडळाने केलेले कामकाज या कार्यकारी समितीमार्फत करुन घेण्यात येते.

२. १० एकाधिकार गवत खरेदी योजना :-

महाराष्ट्र राज्यात ठाणे जिल्हयात आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तालुक्यात गवताचे उत्पन्न चांगले होत असल्यामुळे या योजनेखाली ठाणे जिल्हयाची निवड करण्यात आलेली आहे. आदिवासी महामंडळाने महाराष्ट्र राज्यात वाळलेले गवत विकत

घेण्याचा व्यवहार १९७८ पासून सुरु केला . प्रथम त्यांनी पालघर तालुक्यातील गवत प्रायोगिक तत्वावर खरेदी केले. वाळलेल्या ... गवताच्या गासोड्या बांधून त्यानी महाराष्ट्राच्या दुष्काळी भागाला पुरविल्या. १९७९-८० व १९८०-८१ मध्ये शासनाने प्रतिनिधी [एजंट] म्हणून त्यांनी गवत खरेदी केले. परंतु महामंडळाची आर्थिक परिस्थिती नाजूक असल्यामुळे त्यांना तो व्यवहार जून १९८१ नंतर बंद केला

शासनाने ही योजना पुन्हा अमलांत आणण्यासाठी आदिवासी महामंडळाकडे हे काम १९८५-८६ पासून सुपूर्द केले. १९८५-८६ मध्ये ठाणे जिल्हयाच्या जव्हार व मोखाडा या दोन तालुक्यात गवत एकाधिकार खरेदी योजना कार्यान्वीत करण्यात आली. १९८६-८७ मध्ये या दोन तालुक्यांबरोबर डहाणू तालुक्याचाही अंतर्भाव करण्यांत आला शासनास १९८५-८६ व १९८६-८७ साली अनुक्रमे ३२ लाख व ३५ लाख नफा झाला. या योजनेचे यश लक्षात घेऊन शासनाने हि योजना ठाणे जिल्ह्यातील पालघर, तलासरी व वाडा या तालुक्यात ही योजना ऐच्छिक तत्वावर राबविण्यात आली. १९८७-८८ या हंगामी वर्षात महामंडळाने गवत खरेदी केंद्रासाठी ११२ खरेदी केंद्रे सुरु केली व त्या खरेदी केंद्रावर १. २३, ५७५ मे. टन गवत खरेदी केले. या खरेदी केलेल्या गवताची किंमत रु. ८६३ लाख आहे. याबाबत १९८७-८८ या वर्षात तालुका निहाय खरेदी केलेले गवत व त्याची किंमत दर्शविणारी माहिती सोबतच्या तक्ता २. १ मध्ये दिली आहे. परंतु अचानक पाऊस आल्यामुळे या गवताचे अतोनात नुकसान झाले. त्यामुळे ही योजना पुढे राबवावी किंवा राबवू नये किंवा या योजनेत कोणता बदल करावा याबाबत शासनापुढे प्रश्न निर्माण झाला. या संस्थेने या संबंधीची मुल्यमापन पहाणी घेऊन पाहणीत आढळलेल्या बाबींवर पुढील प्रकरणांत प्रकाश टाकला आहे.

## तक्ता क्र. २.१

### १९८७-८८ या वर्षात प्रादेशिक कार्यालय डहाणू अंतर्गत झालेली गवत खरेदी

| अ. नं. | उपप्रादेशिक कार्यालय | तालुका | गवत खरेदी [ मे. टन] | गवताची किंमत [रुपये लाखात] |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १] | पालघर | १]डहाणू | ९,९०२ | ७२.२७ |
| | | २]पालघर | २१,४८० | १५२.२४ |
| | | | ३१,३८२ | २२४.५१ |
| २] | कासा | १]तलासरी | १२,०७३ | ८५.४२ |
| | | २] डहाणू | ३७,३९७ | २६२.३७ |
| | | | ४९,४७० | ३४७.७९ |
| ३] | वाडा | १] जव्हार | २६,००५ | १७९.६८ |
| | | २] वाडा | ९,३३० | ६३.७१ |
| | | ३] मोखाडा | ६,४०३ | ४०.९३ |
| | | ४] शहापूर | ९८५ | ६.१९ |
| | | | ४२,७२३ | २९०.५१ |
| | एकूण | | १,२३,५७५ | ८६२.८१ |

## प्रकरण ३ रे

## पाहणीचा उद्देश, कार्यपध्दती व मूल्यांकनाच्या मर्यादा.

३.१ प्रस्तावना :-

आदिवासी विकास महामंडळास गवत एकाधिकार खरेदी योजना राबविताना सन १९८७-८८ या वर्षात अंदाजित ३ ते ३.५० कोटी रूपयांचा तोटा झाला. हा तोटा कोणत्या बाबींमुळे झाला त्या बाबी या व्यवहारातून टाळता येतील का ?? हा व्यवहार कसा फायदेशीर होईल ? त्यात काय फेरबदल करणे आवश्यक आहे ? ही योजना महामंडळाने राबवावी किंवा राबवू नये? यासंबंधी निर्णय घेण्याच्या दृष्टिने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेला सखोल अभ्यास करून, योजनेचे मूल्यांकन करण्याच्या सूचना आदिवासी विकास विभागामार्फत देण्यात आल्या. या आदेशानुसार या संस्थेने या योजने : मूल्यांकन पाहणीचे काम हाती घेतले..

३.२ पाहणीचे उद्देश :-

पाहणीचे उद्देश खालील प्रमाणे ठरविण्यात आले.

१] या योजनेमुळे आदिवासींना खरोखरच फायदा होतो का? फायदा होत असल्यास महामंडळाने ही योजना पुढे राबविण्यासाठी घ्यावी का.

२] ही योजना महामंडळाने यापुढे राबविण्यासाठी घ्यावयाची असल्यास कशी घ्यावी ? त्यांत काय फेरबदल करावा का?

३] ही योजना १९८७"८८ मध्ये तोटयात येण्याची प्रमुख कारणे कोणती ?

४] या योजनेत वर्ष १९८७-८८ मध्ये अंदाजित किती नुकसान झाले ?

५] ही योजना आदिवासींना व महामंडळाला कायमस्वरूपी हितावह कशी होईल यासंबंधी सूचना व शिफारसी करणे.

६] यासाठी या पहाणीत खालील बाबींवर प्रकाश टाकण्याचे ठरले.

१] महामंडळाने गवत खरेदी विक्रीचे नियोजन कसे केले होते ?

२] हया योजनेची अंमलबजावणी कशी करण्यात आली होती?

३] ही योजना राबविण्यासाठी शासनाकडून, कार्यकारी संचालकाकडून बरोबर मार्गदर्शन मिळाले का? मार्गदर्शनानुसार महामंडळाकडून कार्यवाही झाली का? झाली नसल्यास का झाली नाही ? व त्यासाठी कोणता घटक जबाबदार आहे?

४] गवत खरेदीचे दर योग्य पध्दतीने ठरविण्यात आले होते का ?

५] विविध खरेदी केंद्रावर गवत खरेदीची कशी व्यवस्था होती?

६] या कामासाठी दिलेला कर्मचारी वर्ग पुरेसा, अनुभवी व तज्ञ होता का ?.

७] गवत विक्री व साठवणुकीबाबत पूर्वनियोजन होते कां ? गवत विक्रीची काय व्यवस्था होती ?

८] ही योजना अधिक फलदायी कशी करता येईल याबाबतचे विचार.

३.३ पाहणीची पध्दत :-

अ] पाहणीसाठी माहिती संकलन :-

योजनेसंबंधीची मूळ माहिती महामंडळाच्या विविध कार्यालयाकडून प्राप्त करणे. माहितीचे संकलन व पृथक्करण करणे.

ब] क्षेत्रीय पाहणी :-

गवत एकाधिकार खरेदीतील लाभधारकांची निवड पध्दतीने निवड करणे, योजनेसंबंधी त्यांचा विचार, तसेच त्याची आर्थिक व सामाजिक बाबींवर माहिती गोळा करणे.

क] गवत खरेदी योजनांतर्गत कर्मचारी, अधिकारी, मार्गदर्शक, यांना भेटून त्यांच्या अडचणी व सूचनांबाबत विचार करणे.

त्यासाठी खालील पध्दतीने कार्यवाही करण्याचे ठरले.

पाहणीतील पहिला टप्पा म्हणजे गवत एकाधिकार खरेदी योजना ज्या कार्यालयातर्फे राबविली जाते त्या कार्यालयांना प्रत्यक्ष भेट देऊन त्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून योजनेच्या विविध अंगाची चर्चा करणे व माहिती मिळविणे.

त्यासाठी खालील कार्यालयांना भेटी देण्यात आल्या.

१] महामंडळ, प्रधान कार्यालय, नासिक.

२] महामंडळ, प्रादेशिक कार्यालय, डहाणू.

३] महामंडळ उपप्रादेशिक कार्यालये, कासा, वाडा, पालघर.

<u>पाहणीतील दुसरा टप्पा म्हणजे क्षेत्रिय पाहणी</u>

या क्षेत्रिय पाहणीत लाभधारकांबरोबर संपर्क साधून त्यांची सामाजिक व आर्थिक परिस्थितीसंबंधी माहिती संकलित करण्याचे ठरले. तसेच त्यांचे या योजने संबंधीचे मत अजमावण्यात आले. यासाठी प्रपत्र क्र. १ तयार करण्यात आले. व त्या पत्रानुसार लाभधारकांची माहिती संकलित केली. त्याचा नमुना परिशिष्ट " अ " मध्ये जोडला आहे.

३.४ <u>केंद्राची व लाभधारकांची निवड पध्दती</u> :-

केंद्राची व लाभधारकांची निवड खालील पध्दतीने करण्यात आली.

एकूण ११२ गवत खरेदी केंद्रापैकी १० टक्के खरेदी केंद्रे म्हणजे ११ गवत खरेदी केंद्र पहाणीसाठी निवडण्याचे ठरले. ही ११ केंद्रे [ रँडम पध्दतीने ] निवड पध्दतीने होण्यात आली. प्रत्येक उपप्रादेशिक कार्यालयाच्या क्षेत्रातून कमीत कमी ३ केंद्रे निवडण्यात आली. निवडलेल्या केंद्रांची नावे परिशिष्ट " ब " मध्ये दिली आहेत.

लाभधारकांची निवड करतांना निवडलेल्या केंद्रातील एकूण लाभधारकांची यादी करण्यात आली व त्यापैकी प्रत्येक केंद्रातून १० लाभधारक निवड पद्धतीने [ Simple Random Sampling Method ] निवडण्यात आले. निवडलेल्या लाभधारकांना प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांचे विषयीचे प्रपत्र भरून घेतले. या माहितीचे संकलन व पृथ:करण करून निघालेल्या निष्कर्षांचा उपयोग पाहणी अहवालात करण्यात आलेला आहे.

या पाहणीचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे या क्षेत्रात काम करणाऱ्या वेगवेगळ्या स्तरावरील कर्मचारी , अधिकारी वर्गाकडून त्यांचे या योजने विषयी मत अजमावणे, त्यांना योजना कार्यान्वित करीत असतांना काय काय अडचणी येतात, या योजनेतील त्रुटी कोणत्या ? हे समजावून घेणे,. असाही असल्यामुळे वेगवेगळ्या स्तरांवरील कर्मचारी व अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यात आला. त्यांचेकडून माहिती ठराविक नमुना प्रपत्र क्र. २ मध्ये संकलित करण्यांत आली ती शेवटी जोडला आहे.

३.५ संदर्भ वर्ष :-

या पाहणीसाठी संदर्भ वर्ष १९८७-८८ घेण्यात आले.

३.६ आदिवासी महामंडळाकडून राबविल्या जाणाऱ्या गवत एकाधिकार खरेदी योजनेची अशा प्रकारची मुल्यांकन पाहणी ही पहीलीच आहे.

३.७ निष्कर्ष आधार :-

या पाहणीतील निष्कर्ष प्राप्त झालेल्या माहितीच्या तसेच लाभधारक, क्षेत्रिय अधिकारी व कर्मचारी यांनी पुरविलेल्या माहितीच्या आधारावर आहे.

## परिशिष्ट " ब "

गवत एकाधिकार खरेदी पाहणीसाठी निवड केलेल्या गवत खरेदी केंद्राची नावे.

| अ. क्र. | तालुका | निवडलेल्या केंद्राचे नांव | जनगणना क्रमांक [१९८१ च्या जनगणने प्रमाणे] |
|---|---|---|---|
| १] | जव्हार | विक्रमगड - १ | ९० |
| २] | जव्हार | वडोली | ३ |
| ३] | वाडा | कोना | १०१ |
| ४] | वाडा | आंबोटघार | ११६ |
| ५] | तालसरी | अच्छाड | २ |
| ६] | तलासरी | वडोवली | २१ |
| ७] | तलासरी | बोरीगांव | १४ |
| ८] | तलासरी | झाईपूळपाडा | २२ |
| ९] | पालघार | सातीवली | १७१ |
| १०] | पालघार | मान | ६१ |
| ११] | डहाणू | वानगांव - १ | १४५ |

## प्रकरण - ४ थे

## १९८७-८८ वर्षात गवत एकाधिकार खरेदी योजना तोटयात का?

## [ कारण मिमांसा ]

४. १ प्रस्तावना :-

आदिवासी महामंडळाने महाराष्ट्र राज्यात वाळलेले गवत विकत घेण्याचा व्यवहार १९७८ पासुन सुरु केला. १९७९-८० व १९८०-८१ पर्यंत अशी सतत तीन वर्षे त्यांनी हा खरेदी-विक्री व्यवहार केला. त्यानंतर गवत खरेदी-विक्रीचा हा व्यवहार १९८४-८५ अखेरपर्यंत महामंडळाने बंद ठेवला होता. १९८५-८६ सालापासून महामंडळाने हा व्यवहार पुन्हा हाती घेतला व आजतागायत हा व्यवहार करीत आहे.

१९७८-७९ मध्ये महामंडळाने ठाणे जिल्हयातील पालघर तालुक्यात प्रायोगिक तत्त्वावर हा व्यापार सुरु केला. प्रथम त्यांनी वाळलेले गवत आदिवासींकडून विकत घेऊन त्याच्या गासोडया बांधून त्या त्यांनी महाराष्ट्राच्या दुष्काळी भागास पुरविल्या. १९७९-८० व १९८०-८१ मध्ये शासनाचे प्रतिनिधी [ एजंट ] म्हणून गवत खरेदीत त्यांनी काम केले.

४. २ मागील कामाचा अनुभव :-

आदिवासी विकास महामंडळाने पूर्वीच्या ३ वर्षात किती माल खरेदी केला , किती माल विकला व प्रत्येक वर्षाअखेरीस महामंडळाकडे

किती माल शिल्लक राहीला, त्या व्यवहारात नफा अगर तोटा किती झाला व हा व्यवहार पुढे बंद का झाला याची कारणे पुढील या संबंधीचा व्यवहार करण्यापूर्वी शोधण्याची आवश्यकता आहे. त्या अनुभवावर पुढील व्यवहार बराच अवलंबून आहे.

४.३ <u>आदिवासी विकास महामंडळाने १९७८-७९ ते १९८०-८१ मध्ये खरेदी केलेल्या गवताचा आढावा</u> :-

| वर्ष | खरेदी केलेला माल [मेट्रीक टन] | विक्री केलेला माल [मेट्रीक टन] | वर्षाअखेरीस शिल्लक माल [मेट्रीक टन] |
|---|---|---|---|
| १९७८-७९ | ७३५२ | ५९४० | ९३६ |
| १९७९-८० | ६१२६ | ५८५३ | ५५४ |
| १९८०-८१ | ५४९५ | ४०७६ | १४१९ |

वरील आकडयावरून असे निदर्शनास येते की, आदिवासी महामंडळाने १९७८-७९ नंतर गवत खरेदीस बराच वाव असूनही प्रत्येक वर्षाला उतरत्या क्रमानेच माल खरेदी केलेला आहे व पुढे १९८१-८२ ला गवत खरेदीचा व्यवहारच बंद केला आहे.

आदिवासी विकास महामंडळाचे काही अहवालामध्ये गवत खरेदी बंद करण्याची कारणे खालील प्रमाणे दिलेली आहेत.

१] आदिवासी महामंडळाची गवत खरेदी करण्याची आर्थिक परिस्थिती नव्हती.

२] वाळलेल्या गवताच्या विक्रीचा मोठा प्रश्न महामंडळापुढे होता.

३] महामंडळाचे गवत विक्री केंद्र नसल्यामुळे आदिवासी विकास महामंडळाने हा व्यापार पुढे बंद केला.

आदिवासी विकास महामंडळाची १९८०-८१ नंतर आर्थिक स्थिती चांगली सुधारलेली दिसते. विक्रीबाबत पुढे महामंडळाला चांगले अनुभव आले. तसेच महामंडळाची खरेदी विक्री केंद्रेही वाढली. त्यामुळे गवत खरेदी करण्यास आदिवासी महामंडळाकडे चांगले पोषक वातावरण निर्माण झाले व त्यांनी हा व्यवहार सन १९८६-८७ पासून पुन्हा सुरु केला. १९८६"८७ व १९८७-८८ मध्ये महामंडळाने गवत खरेदीचा विस्तार मोठया प्रमाणांवर केला.

परंतु पाहणीनंतर असे निदर्शनास आले की, महामंडळाच्या पूर्वीच्या गवत खरेदी-विक्रीतील अनुभवाचा विचार पुढील व्यवहाराची जुळणी व आखणी करण्यासाठी केलेला दिसत नाही. पूर्वीच्या अनुभवामध्ये असे निदर्शनास आले होते की, गवत खरेदीला फार्मि-हाईक नसल्याने व तो माल वाढील दराने खरेदी केला जात असल्यामुळे खरेदीपेक्षा अधिक भावाने मालाची विक्री होणे जड जाते व शक्य होत नाही. म्हणून गवत खरेदी करण्यापूर्वी विक्रीचा विचार प्राधान्याने झाला पाहिजे., परंतु महामंडळाने तसा विचार केलेला दिसत नाही. महामंडळाकडे विक्रीसाठी पुरेशी यंत्रणा व मागणी नसतांना महामंडळाने त्यांच्या कुवती व ताकदीबाहेर माल खरेदी केला. या त्याच्या अतोनात खरेदीत, नियोजनाचा, विक्रीच्या नियोजनाचा

व त्यांच्या कुवतीचा अभाव प्रकर्षाने दिसतो. आज महामंडळाला जो अतोनात तोटा झालेला आहे, त्याचे मूळ ह्य महामंडळाच्या अदूरदर्शीपणातच मोठया प्रमाणांतच समाविष्ट आहे.

४.४ गवताची भाववाढ :-

गवत एकाधिकार खरेदीच्या व्यवहारात १९८७-८८ मध्ये जास्त प्रमाणांत तोटा येण्याची जी बहुविध कारणे आहेत, त्यापैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे महामंडळाने १९८७-८८ मध्ये गवताचे भाव प्रति. मे. टनास रुपये ५०-०० ते १००-०० पर्यंत काहिही सबळ कारण नसतांना वाढवून दिले आहेत. खरे पाहीले असता या भाववाढीला कोणताही भारभक्कम पाया नाही. उलट १९८७-८८ मध्ये मागील पावसामुळे कडब्याचे व चा-याचे उत्पन्न शेतक-यांना चांगले मिळाले होते सर्वत्र चा-याचे भाव उतरलेले होते. अशी परिस्थिती असतांना गवताच्या खरेदीचे दर वाढविण्यात मंडळाचा अदूरदर्शीपणाच दिसतो. वास्तवत: गवताचे भाव व्यापारी पध्दतीने कमी अधिक करण्याची जरुरी असतांना भाव वाढ राजकिय दृष्टिने केल्याचे दिसते.

या तोटयात आणखी भर पडण्याचे कारण महामंडळाची गवत खरेदी विक्री करणा-याच्या कर्मचा-याचे अज्ञान, व्यापारी अशिक्षीतपणा, यामुळे महामंडळ तोटयात जात आहे. याची व्यवस्थापनाला कल्पना नसावी असे दिसते. याचे स्पष्ट उदाहरण म्हणजे गवताची वर्गवारी न करता सर्व प्रकारचे गवत सरसि वाढीव दराने महामंडळाने खरेदी केले आहे. दरवाढीबाबत संचालक मंडळ किंवा कार्यकारी समितीने कोठेही तज्ञांचा सल्ला किंवा मार्गदर्शन घेतलेले दिसत नाही. व विक्री बाजारपाही आढावा घेतलेला दिसत नाही.

आदिवासी विकास महामंडळाने यापूर्वी खवत खरेदीला दिलेले भाव खालील प्रमाणे होते.

| अ. नं. | वर्ष | सुट्या गवताचा प्रती मे. टनास खरेदीचा भाव. |
|---|---|---|
| १] | १९७८-७९ | रु. ६२-०० |
| २] | १९७९-८० | रु. १७१-०० |
| ३] | १९८०-८१ | रु. १८९-०० |
| ४] | १९८५-८६ | रु. ४७५ |
| ५] | १९८६-८७ | रु. ७००-०० |
| ६] | १९८७-८८ | रु. ८००-०० |

जिल्हाधिकारी ठाणे यांनी गवत एकाधिकार खरेदी योजना १९८७-८८ या वर्षात गवत प्रकारानुसार निश्चित केलेले भाव सोबतच्या तक्ता क्र. ४.१ मध्ये दिलेले आहेत.

## तक्ता क्र. ४.१

## गवत एकाधिकार खरेदी योजना

जिल्हाधिकारी ठाणे यांनी निश्चित केलेले १९८७-८८ हंगामातील दर

| गवताचा प्रकार | सुटे गवत [प्रती मे. टन] | गासडी भाव [प्रती मे. टन] | जिल्हाधिकारी आदेश दिनांक. |
|---|---|---|---|
| १] फुल | ६५० | ८७५ | १-१०-१९८७ |
| २] भोलसेल | ७०० | ९२५ | १-१०-१९८७ |
| ३] बर्डी | ७०० | ९२५ | १-१०-१९८७ |
| ४] रोहिडा | ७५० | ९७५ | १. १०-१९८७ |
| १] फुल | ७०० | x | १९-१०-८७ |
| २] भोलसेल | ७५० | x | १९-१०-८७ |
| ३] रोहडा<br>४] बेर<br>५] मुशी | ८०० | x | ४-११-८७ |

वरील खरेदीच्या दरावरून एक गोष्ट निश्चित लक्षांत येते की, भाववाढीचे प्रमाणे सर्व सामान्य बाजारातील भाववाढीपेक्षा निश्चित अधिक आहेत. ही भाववाढ अनैसर्गिक म्हणावी, कि परिस्थितीजन्य म्हणावी याचे स्पष्टीकरण महामंडळाच्या व्यवस्थापनाकडून समाधानकारक मिळू शकले नाही.

आता फक्त १९८७-८८ सालाचाच विचार केला व प्रत्येक मे. टनमध्ये कमीत कमी रु. १००/- वाढीव दर दिला गेला असे गृहित धरले तर १९८७-८८ मध्ये महामंडळाने १,२३,५७५ मे. टन गवत खरेदी मागे रु. १२३-०० लाख अदा केलेले आहेत. असे म्हणता येईल व ही रक्कम एकूण तोटयातून वजा केली तर एकूण झालेल्या तोटयाची तिव्रता बरीच कमी झालेली आढळेल.

४.५ गवताची विक्री :-

१९८७-८८ मध्ये महामंडळाकडून गवत एकाधिकार खरेदीस तोटा येण्याचे दुसरे प्रमुख कारण असे दिसते की, महामंडळाच्या अधिका-यांनी जेवढे गवत खरेदी केले होते ते वेळेवर विकले गेले नाही. तो माल वेळेवर विकण्याचा फारसा यशस्वी प्रयत्नही झालेला दिसत नाही. जेवढया एजन्सीजनी [ गवत खरेदीदारांनी ]महामंडळाशी संपर्क साधला तेवढयांनाच महामंडळाने माल विकलेला दिसतो. याशिवाय वेगळे प्रयत्न झालेले दिसत नाहीत. मुंबईचा गवताचा बाजार गवत एकाधिकार खरेदीमुळे आदिवासी महामंडळाने प्रथमपासून हातात ठेवावयास पाहिजे होता. तशी ही बाजारपेठ जवळची होती. मुंबईला दररोज ४०० ते ५०० मे. टन गवत लागते. त्यापैकी महामंडळाकडे

१,२३,००० मे. टन म्हणजे मुंबईच्या मागणीच्या १/४ गवताचा साठा होता. हा गवताचा साठा मुंबईस खुल्या बाजारात जरी विकला असता तरी तो मंडळाला परवडू शकला असता. मुंबईस सद्या लांबून म्हणजे गुजराथपासून माल येतो. इतक्या लांबून येणा-या मालापेक्षा मुंबईच्या जवळच्या मालाला वाहतुकीच्या दृष्टिने कमी खर्च पडून तो विक्रीच्या दृष्टिने किफायतशीर ठरला असता व खरेदी करणा-यांसही तो स्वस्त मिळाला असता. या उलट खाजगी व्यापा-यांनी आदिवासी महामंडळाकडून गवत खरेदी करुन ते मुंबईत ब-याच वाढीव दराने आढळून आले आहे. त्यामुळे आदिवासी महामंडळाने खरेदी केलेला माल मुंबईत विकला जात नाही. हे म्हणणे रास्त वाटत नाही.

१९८७-८८ या वर्षात भारतात पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे गुजरात, राजस्थान, महाराष्ट्रातील काही भागात दुष्काळी स्थितीची बरीच चिन्हे दिसत होती. या राज्यांमध्ये चा-याची बरीच टंचाई निर्माण होण्याची शक्यता होती. दुष्काळी परिस्थितीचा फायदा मिळेल व गवताला दुष्काळी भागातून चांगली मागणी येईल म्हणून गवत राखून ठेवण्याचा आदिवासी महामंडळाचा कदाचित विचार असेल व त्यामुळे महामंडळाने हा माल लवकर विकण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न केले नसतील असे वाटते. परंतु असा दृष्टिकोन महामंडळाच्या कामात दिसला नाही. तसेच प्रयत्न लेखी स्वरुपात केल्याच आधारही कोठे मिळत नाही.

## ४.६ आदिवासी विकास महामंडळाची १९८७-८८ या वर्षाच्या प्रत्येक महिना अखेर, खरेदी, विक्री, व शिल्लक मालासंबंधी माहिती :-

आदिवासी विकास महामंडळाची १९८७-८८ या वर्षातील प्रत्येक महिनाअखेर खरेदी, विक्री व शिल्लक मालासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता.

| महिना अखेर | महिनाअखेर खरेदी [मे. टन] | महिना अखेर विक्री [मे. टन] | विक्रीचे खरेदीशी शेकडा प्रमाण | शिल्लक मालाचे खरेदीशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| आक्टोबर ८७ | १०,७३२ | ० | ०.०० | १००.०० |
| नोव्हेंबर ८७ | ८०,८९२ | ० | ०.०० | १००.०० |
| डिसेंबर ८७ | १,१५,१७६ | ७७० | ०.६७ | ९९.०० |
| जानेवारी ८८ | १,१८,४६७ | १,१०१ | १.८६ | ९८.१४ |
| फेब्रुवारी ८८ | १,२३,१०१ | ६,३४१ | ५.११ | ९४.८९ |
| मार्च ८८ | १,२३,१०१ | ११,६५९ | ९.३९ | ९१.६१ |
| एप्रिल ८८ | १,२३,२४० | २५,१४७ | २०.४० | ७९.६० |
| मे ८८ | १,२३,३५२ | ४९,१४० | ३९.८४ | ६०.१६ |
| जून ८८ | १.२३,५७५ | ५९,३१० | ४८.०० | ५२.०० |

वरील आवहयावरून खालील बाबी स्पष्ट होतात.

१] महामंडळाने गवत खरेदीस आक्टोबर ८७ मध्ये सुरुवात केली.

२] फेब्रुवारी १९८८ अखेर महामंडळाची जवळजवळ पूर्ण खरेदी झालेली होती. परंतु त्यानंतर विक्रीच्या बाबतीत महामंडळाचे फारसे प्रयत्न झालेले दिसत नाहीत. आक्टोबर ते मार्च या ६ महिन्यात खरेदीच्या फक्त ९.३९ टक्केच माल विकलेला आहे. यापेक्षा थोडी अधिक विक्री एप्रिल व मे मध्ये झालेली दिसते. जून १९८८ अखेर ५२ टक्के माल महामंडळाकडे शिल्लक राहीलेला दिसतो. यावरुन असे स्पष्ट होते की, महामंडळाला गवत विक्रीत ...यश आलेले नाही.

४.७ गवत साठवणूक साधनसोयींची व्यवस्था :-

आदिवासी विकास महामंडळाकडे गवत साठवणूकीसाठी व्यवस्था उपलब्ध नाही. गवताची साठवणूक करुन पावसाळ्यात गवताला चांगला भाव मिळत नाही. उलट जंगलात हिरवे गवत उपलब्ध झाल्यानंतर वाढलेल्या गवताची किंमत घसरते. हे साधे सामिकरण आदिवासी विकास महामंडळाला पूर्वीच्या अनुभवावरुन माहित ... असावयास हवे होते. त्यामुळे आदिवासी विकास महामंडळाने खरेदी केलेल्या गवताचा साठवणूकीपेक्षा गवताची विक्री ३० एप्रिल पूर्वी होणे आवश्यक होते. या बाबत महामंडळ असफल ठरले आहे. गवताच्या खरेदी--विक्रीचा अनुभव लक्षात घेऊन महामंडळाने या बाबतीत हालचाल करावयास पाहिजे होती. ती झालेली नाही.

पहिल्या चार महिन्यात खरेदीच्या फक्त २ टक्के मालाची विक्री झाल्याचे दिसते. व ९८ टक्के माल तसाच शिल्लक होता. फेब्रुवारी ते मार्च १९८८ मध्ये विक्रीचे मामुली प्रयत्न झालेले दिसतात. एप्रिल अखेर

१०० टक्के विक्री अपेक्षित होती. तेथे ती फक्त २०.४० टक्के झालेली आहे.

आदिवासी महामंडळाकडून मे व जून ८८ मध्ये बराच माल गुजरात राज्याने उचलल्यामुळे शिल्लकीचे प्रमाण .५२ टक्क्यापर्यंत आलेले दिसते. हा शिल्लक माल पुढे पावसाच्या तडाख्यात सापडून गवताची नासाडी झाली. त्यापैकी काही साठा वाचविण्याचा प्रयत्न महामंडळाने शासकीय, निमशासकीय, व खाजगी गोदामे भाड्याने घेऊन व वहातुक केलेला दिसतो. परंतु तो आर्थिकदृष्ट्या बराच खर्चिक झालेला आहे. त्यातून महामंडळाला फायदा न होता तोटाच होण्याचा दाट संभव आहे.

आदिवासी विकास महामंडळाकडे स्वत:ची गोदामे नसल्यामुळे गवताची साठवणूक करावयास नको होती. ज्या प्रमाणात गाठी तयार झाल्या त्याप्रमाणात विक्री करण्याची जरुरी होती. नफ्याचा फारसा विचार न करता मालाचा साठा जेवढा कमी करता येईल तेवढा तो करावयाची आवश्यकता होती. तसे ते झालेले नाही.

४.८ आदिवासी विकास महामंडळाचे विक्रीचे नियोजन :-

आदिवासी विकास महामंडळाने १९८७-८८ च्या हंगामात गवत एकाधिकार खरेदी योजना कार्यान्वित करण्यासाठी तयार केलेल्या अहवालात फक्त ४५,००० मे. टन गवत विक्रीसाठी उपलब्ध होईल.

असा अंदाज केला होता. १९८७-८८ हे वर्ष गवताच्या चांगल्या हंगामाचे असल्यामुळे महामंडळाचा हा अंदाज साफ चुकला. ४५,००० मे. टन ऐवजी महामंडळाला जवळ जवळ तिप्पट गवत १,२४,००० मे. टन गवत नियोजनाशिवाय खरेदी करावे लागले.

२] मागील वर्षी आदिवासी विकास महामंडळाकडे खालील राज्यांच्या / संस्थांच्या गवत खरेदीच्या मागण्या आलेल्या होत्या.

| अ. नं. | संस्था / राज्य | मागणी मे. टन. | मागणीनुसार उचललेले गवत [मे. टन] |
|---|---|---|---|
| १] | महाराष्ट्र राज्य | ४०,००० | ३०० |
| २] | गुजरात राज्य | ८०,००० | ४७,२२५ |
| ३] | राजस्थान राज्य | ५,००० | --- |
| ४] | मिलिटरी | ५,००० | --- |
| ५] | श्री सर्व सेवा संघ, कच्छ | १०,००० | --- |
| ६] | स्वंयसेवी संस्था व खाजगी संस्था. | १०,००० | ११,५१२ |
| | एकूण | १,५०,००० | ५९,०३७ |

: :



महामंडळाकडे आलेल्या या मागणीपैकी फक्त १/३ साठा मागणीदारांनी उचलला.

आदिवासी विकास महामंडळाकडे एकदा प्रचंड साठा होता की, या मागण्यांवरच विसंबून राहण्यास नको होते. तसेच गुजराथ राज्य व्यतिरिक्त इतरांनी कोणतीही ठेव रक्कम ठेवलेली नव्हती. गुजराथ राज्याने जेवढ्या गवतासाठी ठेव रक्कम ठेवली होती तेवढा माल त्यांनी ठरलेल्या तारखेपर्यंत उचलला नाही. पुढे जसजसा पावसाळा जवळ येत गेला तसतशी वाहतुकीची साधने दुर्लभ झाली त्यामुळे गुजराथ राज्याला पावसाळ्यापूर्वी त्यांच्या मागणी इतका माल जाऊ शकला नाही. त्यामुळे बराच माल पडून राहीला. गुजराथ राज्याने मुदतीच्या आत ठरलेला माल उचलला असता तर आदिवासी महामंडळाकडे फारसे गवत शिल्लक राहिले नसते. गुजराथ राज्याच्या गवताची परिस्थिती [illegible] जसजशी सुधारत गेली तसतशी त्यांची मागणी कमी होत गेली . ज्या राज्यांनी/संस्थांनी काहीही ठेव ठेवली नव्हती , त्यांना मागणीची काहीही झळ बसली नाही. त्यामुळे त्यांनी गवत उचलले नाही.

[illegible] या व्यवहारात आदिवासी विकास महामंडळाने व्यापारी दृष्टिकोन स्विकारावयास पाहीजे होता. तो त्यांनी स्विकारलेला दिसत नाही. जसजशी राज्याची मागणी कमी होत गेली तसतसा माल मुंबईस किंवा खाजगी व्यापाऱ्यांना चालू भावात विकावयास पाहिजे होता. तसा तो विकलेला नाही . [illegible] माल होणार नाही., असे समजताच त्याचा पर्याय त्यांनी त्वरीत शोधण्याची

जरुरी होती. तसे केलेले दिसत नाही. त्यांचेकडे गाठी बांधून माल विक्रीस तयार नसल्यामुळे ती ते कदाचित विकू शकले नसतील हे ही त्यामागे एक महत्वाचे कारण असू शकेल. परंतु नियोजित वेळेप्रमाणे विक्रीस माल ठेवण्याची जबाबदारी महामंडळावरच येते. महामंडळाचे नियोजन पूर्णपणे फसले.

वरील मुद्यांच्यास्पष्टीकरणार्थ काही उदाहरणे देणे येथे उपयुक्तीक ठरेल असे वाटते. ती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

खालील बाबीकडे आदिवासी विकास महामंडळाच्या धोरणात्मक निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केलेले दिसते. त्यामुळेच गवत एकाधिकार खरेदी योजनेत महामंडळाला तोटा आलेला दिसतो.

१] व्यवस्थापकीय संचालक,
२] महाव्यवस्थापक [विपणन]
३] प्रादेशिक व्यस्थापक.

धोरणात्मक निर्णय घेण्याच्या संदर्भात एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात घेतली पाहीजे आणि ती म्हणजे शासनाच्या [मंत्रालयाच्या] पातळीवरुन महामंडळाच्या व्यवस्थापक यंत्रणेला वेळोवेळी सूचना दिल्याचे विविध कागदपत्रावरुन लक्षात येते. शासन या प्रश्नात सतर्क झालेले होते परंतु शासनाच्या सतर्कतेचा योग्य तो परिणाम मात्र खालील यंत्रणेवर झालेला दिसत नाही.

४.९ व्यवस्थापनेतील सदोषता :-

अ] व्यापारी दृष्टीकोनाचा अभाव :-

१] १९८६-८७ अखेर महामंडळाने जास्तीत जास्त वर्षाला २७,२१४ मे. टन गवत खरेदी केलेले आहे. १९८७-८८ मध्ये या मालाच्या पाच पटीने माल [ गवत ] खरेदी करण्यात आला खरेदीच्या प्रमाणात विक्रीसंबंधी पूर्व नियोजन फारसे झालेले दिसत नाही. गवत एकाधिकार खरेदीच्या कामाला आक्टोबर १९८७ मध्ये सुरुवात झाली. माल खरेदी करण्यात येत होता तेव्हाच गवताच्या गाठी बांधण्याचे व विक्रीचे काम सुरु केले असते तर एप्रिल १९८८ अखेर खरेदीच्या २[illegible] टक्के माल शिल्लक राहीला असता व तेवढा माल भाड्याच्या गोदामात साठविणे सोपे गेले असते. परंतु ८०,००० ते ९०,००० मे. टन गवत भाड्याच्या गोदामात साठविणे महामंडळाच्या कुवतीपलीकडे होते, हा माल साठविण्यासाठी मोठी गोदामे मिळणे अशक्यप्राय होते. त्यासाठी गवताची विक्री खुल्या बाजारभावाने आक्टोबर ८७ पासून सुरु करावयास पाहीजे होती. पहिल्या ४ महिन्यात तर खरेदीच्या २ टक्के देखील माल विकला गेला नव्हता पुढील २ महिन्यात ९८ टक्के माल विकणे शक्य नव्हते.

गवत विक्रीचे अधिकार फक्त व्यवस्थापकीय संचालकांनाच होते. विभागीय व्यवस्थापकांना/ उपव्यवस्थापकांना याबाबतीत अधिकार दिलेले नव्हते. त्यामुळे विक्री करणारी निर्णय घेणारी यंत्रणाच अपूरी पडली. व्यवस्थापकीय संचालकांनी निर्णय तातडीने घ्यावयास पाहिजे होते.

तसे त्यांनी घेतलेले दिसत नाही. त्यामुळे खरेदी केलेला माल फक्त थप्पीला लावला गेला. गासडया बांधण्याचे काम त्याचवेळी सुरू झाले नाही. महामंडळाकडे गासडया बांधण्यासाठी पूर्ण यंत्रणा व साधनसामुग्री नव्हती. गवत खरेदीपूर्वी महामंडळाने त्यांचा विचार केलेला दिसत नाही. आदिवासी महामंडळाकडे गाठी बांधण्याची यंत्रसामुग्री पुरेशी नसल्यामुळे दर दिवशी आवक मालाच्या प्रमाणात गाठी बांधल्या जात नव्हत्या.

२] जवळच्या मुंबईच्या बाजारपेठेत माल विक्रीचे फारसे प्रयत्न झालेले दिसत नाहीत.

३] गासडया बांधलेल्या माल ठराविक पध्दतीने मान्सूनपूर्वी रचून ठेवावयास पाहीजे होता. जेणेकरून त्याचे रक्षण होऊ शकेल, तसे न ठेवता सर्व गासडया उघाडयावर ठेवल्या व त्यामुळे त्या अधिक प्रमाणात मान्सून पावसापासून वाचू शकल्या नाहीत.

४] प्रतवारी प्रमाणे माल न लावल्यामुळे व गासडयाची बांधणी सुबक नसल्यामुळे हा माल बाजारात मार खाईल अशी भिती आदिवासी विकास महामंडळाच्या व्यवस्थापनेला वाटत होती,. त्यामुळे त्यानी तो माल मुंबईस विकलेला नाही. व त्यासाठी खास प्रयत्न केले नाहीत.

५] वास्तवत: आदिवासी महामंडळाकडे विक्रीची व साठवणूकीची जेवढी व्यवस्था होती तेवढाच माल त्यांनी खरेदी करावयास पाहीजे होता त्यांनी तसे न करता एकाधिकार खरेदीचे धोरण स्विकारल्यामुळे आदिवासी बरोबरच बिगर आदिवासींचा माल खरेदी केला गेला. त्यात व्यापा-यांचा माल अधिक होता.

६] आदिवासी विकास महामंडळ अधिका-यांनी वरिष्ठ अधिका-याचे आदेश धुडकावून खाजगी व्यापा-यांना गवताचा साठा विक्रीसाठी घेण्याचे परवाने / परमिट दिलेले आहेत. त्यामुळे महामंडळाचा माल तसाच बराच पडून राहीला व त्याला भाव मिळाला नाही.

७] खरेदी केंद्रांना पाडा प्रेस वेळेवर पुरविणे किंवा पाडा प्रेसवर ठेकेदार पध्दतीने [ Contract basis ] काम करुन घेण्यास मुख्यालयाने परवानगी . वेळेवर देणे, गाठी बांधण्यासाठी वेळेवर तार पुरविणे या बाबी दिसावयास किरकोळ असल्यातरी या बाबीमुळेही प्रेसिंग कामास [ गासोडया ] विलंब लागला व लक्षाप्रमाणे गासोडया बांधण्याचे काम वेळेवर होऊ शकले नाही. व्यापा-याकडून प्रेस भाडयाने मिळण्यास व्हावे तेवढे सहकार्य मिळू शकले नाही. खरेदी झालेल्या गवताच्या मानाने प्रेस संख्या कमी होती. [illegible]ा प्रेस भाडयाने देण्यास व्यापारी वर्गाचा असहकार होता. व त्यामुळे बराच माल प्रेस न झाल्यामुळे पावसात वाया गेला.

८] मजूरांची गासोड्या बांधण्याच्या दराची वाढीव मागणी त्यामुळे संप तसेच आदिवासींचे सण व इतर कारणास्तव त्यांची अनियमितपणे उपस्थिती, हे पण अपयशाचे कारण आहे.

संचालक मंडळ व कार्यकारी मंडळाच्या निर्णयाची अंमलबजावणी :-

आदिवासी विकास महामंडळाकडून संचालक मंडळ व कार्यकारी मंडळाने विशिष्ट सभेत घेतलेल्या निर्णयावर अंमलबजावणी नीटपणे झालेली नाही. कार्यकारी मंडळाने व संचालक मंडळाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेले होते.

| संचालक/कार्यकारी मंडळाच्या सभेची तारीख:- | मंजूर निर्णय/ठराव :- |
|---|---|
| १] कार्यकारिणी सभा दि. २९-१२-८७ | श्री. पिंपळे, उपसचिव, यांचा ठराव खालील प्रमाणे होता. गवताची विक्री लवकर केल्यास वजनामध्ये घट कमी होईल व महामंडळाचा फायदा होईल, व्याजाची रक्कम वाचेल. होळीच्या अगोदर माल विकल्यास फायदेशीर राहील. महाराष्ट्रात रब्बी पिकांचा हंगाम चांगला आहे. कडब्याचे उत्पन्न महाराष्ट्रात |

चांगले होईल. त्यामुळे महाराष्ट्र शासनाला गवत लागणार नाही. व गुजरात राज्याने कडब्याची खरेदी सुरु केली तर आपल्या गवताला मागणी रहाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर गवत विक्री होण्याच्या दृष्टिने खरेदी होणाऱ्या गवतापैकी १०,००० मे. टन निश्चित केलेल्या दरानुसार खुल्या बाजारात विक्री करण्यात यावी. वरील प्रमाणे कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यांत यावेत.

संचालक मंडळाची
सभा
दिनांक २९-११-८७

ठराव क्र. ७

" राज्यात अपोरा झालेल्या पावसामुळे बहुतांशी चारा टंचाई कमी झाली आहे. तसेच कडबा कुटीचे भावही उतरलेले आहेत. त्यामुळे शासनाची मागणी कमी राहण्याची शक्यता आहे. शासनाची निश्चित मागणी जाणून घेऊन उर्वरित गवताची विक्री महामंडळाने खाजगी गवत ठेकेदार गुजरात, राजस्थान व संरक्षण विभागाच्या मागणीनुसार करण्याचे दृष्टीने गवत विक्री करावी. अध्यक्ष महोदयांनी सुचविले की, सध्या दुष्काळ आहे म्हणून गवत खपते आहे. या गवताची विक्री पुढे कमी

होणार याचा विचार होणे जरुरीचे आहे. यापढेसर्व गवत खरेदीची जबाबदारी आपण घेऊ नये "

संचालक मंडळाची सभा दि. ६-५-८८

<u>ठराव क्र. ५.</u>

ठराव करण्यात येतो की, " महामंडळातील शिल्लक असलेल्या गवताच्या विक्री, साठवणूक इ. दृष्टिने समोर येणारा पावसाळा लक्षात घेता गवताच्या व्यवहारात कमीत कमी नुकसान येणेच्या दृष्टीने खालील कार्यवाही तातडीने करण्यात यावी.

१] गुजरात राज्यास द्यावयाच्या २०,००० मे. टन जादा मागणीच्या गवताची वाहतुक महामंडळाने ट्रकने रावी.

२] रेल्वेव्दारा गवताची जास्तीत जास्त वाहतुक करण्यासाठी कार्टींग एजंट नेमण्यात यावा, त्यास रु. १०/- प्रति वॅगन या प्रमाणे कमिशन देण्यात यावे.

३] खरेदी केंद्रावरुन गवताची जास्तीत जास्त विक्री होण्यासाठी विक्री सल्लागार नेमण्यात यावा. त्याच त्यांने पैसे भरुन विक्री करुन दिलेल्या गवतापोटी कमिशन द्यावे.

४] गुजरात मधील स्वंयसेवी संस्था जर ट्रकने खरेदी केंद्रापासुन गवत उचलण्यास तयार असतील तर त्यासाठी गवताचा विक्री दर रु. ९००/- प्रती मे. टन ठेवावा.

५] गवताची विक्री करण्याच्या हेतूने परिस्थिती बघुन गवताच्या विक्रीचे दर कमी अधिक करण्यात यावेत.

६] मुंबई व आसपासच्या भागात गवताची आवश्यकता असल्याने यासाठी खरेदी केंद्रांवरुन ट्रकने गवत वाहतुक करण्याच्या अटीवर रुपये १००/- मे. टन या दराने गवताची विक्री करुन यासाठी आवश्यक प्रसिध्दी वृत्तपत्रात द्यावी. मात्र जे खरेदीदार २० मे १९८८ पर्यंत गवत खरेदी करतील, त्यांनाच ही सवलत द्यावी.

वरील ठरावांची अंमलबजावणी नीटपणे न झाल्यामुळे महामंडळाला मोठया प्रमाणावर नुकसानीला तोंड द्यावे लागले.

## प्रकरण - ५ वे

## एकाधिकार गवत खरेदी योजना [ १९८७-८८ ]

### अंदाजित झालेले नुकसान

महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्ह्यात १९८७-८८ या वर्षात १] जव्हार, [२] मोखाडा, [३] वाडा, [४] तलासरी, [५] डहाणू व [६] पालघर तालुक्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात आदिवासी विकास महामंडळाने एकाधिकार खरेदी पध्दतीने गवत खरेदी केले. या सर्व तालुक्यात या हंगामी वर्षात महामंडळाने एकूण ११० खरेदी केंद्रे सुरु केली होती. या व्यतिरिक्त शहापूर तालुक्यात २ खरेदी केंद्रे ऐच्छिक तत्वावर सुरु केली होती. या खरेदी केंद्राची तालुकानिहाय संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | तालुका | खरेदी केंद्राची संख्या |
|---|---|---|
| १] | जव्हार | २० |
| २] | वाडा | १० |
| ३] | मोखाडा | ९ |
| ४] | डहाणू | ३२ |
| ५] | तलासरी | १६ |
| ६] | पालघर | २३ |
| ७] | शहापूर | २ |
| | एकूण | ११२ |

या खरेदी केंद्रावर आदिवासी विकास महामंडळाने १९८७-८८ या वर्षात ३०-६-८८ अखेर १,२३,५७५ मे. टन गवत खरेदी केले. त्याचे खरेदीच्या भावाने किंमत ८६२.८१ लाख रुपये होती. त्यापैकी ५९,७७५ मे. टन गवत आदिवासी विकास महामंडळाने जून १९८८ अखेरपर्यंत विकले. त्याची विक्रीची किंमत रुपये ६,८१,०६९ मिळाली. [गवताच्या प्रकाराप्रमाणे] गवताची खरेदी , साठा व मालाच्या साठवणूकीतील तूट तक्ता ५.१ मध्ये दिलेली आहे. ] विक्री वजा जाता खरेदी केलेल्या शिल्लक मालाचा हिशोब ६३,७९९ मे. टन एवढा होता. एकूण शिल्लक माल खरेदी केलेल्या मालाच्या ५१.६३ टक्के येतो.

दिनांक ८-६-१९८८ रोजी ठाणे जिल्हयात अचानक पाऊस आल्यामुळे उघडयावर ठेवलेल्या गवताचे फार मोठे नुकसान झाले. या शिल्लक असलेल्या गवताचा आढावा खालील प्रमाणे आहे.

## तक्ता क्र. ५.१

दिनांक ३०-६-१९८८ अखेर गवताच्या प्रकाराप्रमाणे गवताची खरेदी, साठा व मालाच्या साठवणूकीत तूट दर्शविणारा तक्ता

| गवत प्रकार | ३०-६-८८ अखेर झालेली खरेदी: मे. टन मध्ये | ३०-६-८८ अखेर झालेली खरेदी: किंमत रुपये लाखात | विक्री केलेला माल: मे.टन मध्ये | विक्री केलेला माल: किंमत रु. लाखात | मध्यवर्ती गोदाम प्रक्रिया केंद्रास माल | साठा पुस्तका-प्रमाणे शिल्लक माल | प्रत्यक्ष आढळून आलेला साठा | रक्कम रु. ४-५-६-८ | मालाच्या साठवणूकीतील तूट | शेकडा तूट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| फुल नं. १ | १००३१८ | ७०९.०१ | ५६३५८ | ६४१.४५ | १५९८० | २८०५१ | १८४११ | २०७४८ | १०६३८ | १०३.२१ |
| फुल नं. २ | ९८५९ | ४९.२९ | ६९२ | ८.१० | ३७४ | ७२११ | ३८०१ | ४८६६ | ३४१० | २१.५३ |
| बेलतेल | ७७५१ | ६१.२९ | १८५० | २२.४९ | ४१७७ | २३४७ | ११२१ | ७२४८ | ११२७ | १३.२२ |
| बेर | १५४८ | १२.४१ | ३७१ | ३.८७ | ३१२ | ७५३ | ५४७ | १२३१ | २०६ | २.५० |
| बर्डी | ३९९६ | २९.९९ | ५०४ | ५.७८ | १०५८ | २४३३ | ८२९ | २३९२ | १६०४ | १४.२३ |
| रोहडा | १०२ | ०.८२ | - | - | ५३ | ५० | - | ५३ | ५० | ०.४० |
| एकूण :- | १२३५७४ | ८६२.८१ | ५९७७५ | ६८१.६९ | २२९५४ | ४१८४५ | २४८०९ | १०६५३८ | १७०३४ | १५५.०९ |

शेकडा तूट १३.७९ टक्के.

## विक्री झालेल्या व शिल्लक गवताचा आढावा

[ ३०-६-८८ अखेर ]

| अ. नं. | बाब | गवत मे. टन | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | ३०-६-८८ पर्यंत खरेदी झालेले गवत | १,२३,५७४ | १००.०० |
| २] | विक्री झालेले गवत | ५९,७७५ | ४८.३७ |
| ३] | गवतातील घट/तूट माल | १७,०३५ | १३.७९ |
| ४] | विक्री नंतर शिल्लक माल | ४६,७६४ | ३७.८४ |
| ५] | शिल्लक मालापैकी विक्री योग्य माल | | |
| | अ] गोदामातील सुरक्षित माल | १३,७१५ | |
| | अ] ताडपत्रीने झाकलेला माल | ८,१०० | |
| | एकूण | २१,८१५ | १७.६५ |
| ६] | भिजलेला व नुकसान झालेला माल | | |
| | अ] उघड्यावरील गवत | २४,८०९ | |
| | ब] गासड्या न बांधलेले मोकळे गवत | १४० | |
| | एकूण | २४,९४९ | २०.१९ |

वरील माहितीवरुन थोडक्यात असे म्हणता येईल की, आदिवासी विकास महामंडळाने खरेदी केलेले व पावसात भिजून नुकसान झालेले गवत खालीलप्रमाणे देता येईल.

| | | मे. टन |
|---|---|---|
| अ] | गासडया न बांधलेले मोकळे गवत | २४,८०९ |
| ब] | उघडयावरील गवत | १४० |
| क] | ताडपत्रीने झाकलेले गवत | ८,१०० |
| | एकूण | ३३,०४९ |

३३,०४९ मे. टन गवत पावसात भिजून वाया गेले. त्याचे एकूण खरेदीशी प्रमाण २७ टक्के एवढे आहे. या व्यवहारातील अंदाजित नफातोटा खालील दोन पध्दतीने काढता येईल.

" अ " पध्दत :-

खरेदीची किंमत + गवतावर झालेला सर्व खर्च – आजच्या विक्री भावाने किंमत = नुकसान / तोटा.

" ब " पध्दत :-

खरेदीची किंमत + गवतावर झालेला सर्व खर्च – त्या वेळच्या बाजारभावाने विक्रीची किंमत = व्यापारी नफा/तोटा

दनैन्दीही पध्दतीने गवत बांधण्यासाठी व ते सुरक्षित ठेवण्यासाठी दर मे. टनामागे झालेला खर्च काढणे आवश्यक आहे. तो सोबतच्या तक्त्यात काढलेला आहे.

गवत बांधण्यासाठी व ते सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी दर मे. टनासाठी येणारा खर्च :-

| अ. नं. | बाब | दर मे. टनास खर्च [रुपयात] |
|---|---|---|
| १] | वाहतुक खर्च | ४९. ३५ |
| २] | बँकेचे व्याज सहा महिन्याचे | ४८. ६५ |
| ३] | प्रेसिंग खर्च | ८०. ०० |
| ४] | गोडावून व जमिनीचे भाडे | ५०. ५१ |
| ५] | कर्मचा-याचे पगार व भत्ते | २४. ८५ |
| ६] | हमाली | २३. ०० |
| ७] | रखवालदार खर्च | २२. ०० |
| ८] | मोजमाप यंत्रा भाडे व इतर | ३. २५ |
| ९] | हुंडी डिस्काऊंट | २. ४५ |
| १०] | कर्मचा-याचे फिरतीवर | ४. ९० |
| ११] | मशिन्स / वाहनू वरील घसारा | १०. ४५ |
| १२] | वाहनांवरील डिझेल इत्यादीचा खर्च. | ४. २५ |
| १३] | इतर विविध बाबींवरील खर्च | ४. ०४ |
| | एकुण | ३२७. ७० |

या हिशोबात दर मे. टनामागे रु. ३२७.७० खर्च गृहित धरलेला आहे.

[१] " अ " पध्दतीने काढलेला तोटा :-

खर्चाची बाजू :-

१] प्रति मे. टनास गवत, वहातुक बंधाईसाठी व सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी एकूण १, २३, ५७४ मे. टनास आलेला खर्च [१, २३, ५७४ x ३२७, ७० ] — ४, ०४. ९६ लाख

२] सर्व गवताची खरेदीची किंमत — ८, ६२, ८१ लाख

३] विविध खर्च :-

अ] गुजराथ राज्याला ट्रकच्या गात वाहतुकीसाठी द्यावे लागणारे अनुदान रु. ३५०/- प्रती मे. टन ९४८५ मे. टनास — ३२. २० लाख

ब] शिल्लक मालाच्या साठवणूकीसाठी व शेतकऱ्यांना झालेल्या पिकाच्या नुकसानीस्तव द्यावी लागणारी भरपाई — २. ०० लाख

| | |
|---|---|
| रुपये | ३४. २० लाख |
| एकूण खर्च रुपये | १३०१. ९७ लाख |

जमेची बाजू :-

आदिवासी विकास महामंडळास गवत विक्रीपासून आलेले उत्पन्न अपेक्षित/ अंदाजित आहे.

| | | लाख रुपये |
|---|---|---|
| १] | विकलेल्या ५९,७७५ मे. टन गवताची मिळालेली किंमत | ६८१.६९ |
| २] | गोदामातील सुरक्षित मालापासून आजच्या दराने अपेक्षित किंमत रुपये ४०० प्रति मे. टनास [ १३,७१५ मे. टनासाठी ] | ५४.८६ |
| ३] | ताडपत्रीने झाकलेल्या गवतापासून जास्तीत जास्त येणारी किंमत दर मे. टनास रु. १००/- प्रमाणे ८१०० टनासाठी | ८.२० |
| ४] | उघड्यावर असलेल्या व गासड्या न बांधलेल्या २४,९४९ मे. टनास | -- |
| | एकूण जमा | ७४४.७५ |

तोटयाची बाजू :-

वरील आकडेवारीवरुन असे स्पष्ट होते की, महामंडळास गवत विक्रीपेक्षा गवत खरेदीसाठी जास्त खर्च आलेला आहे. व त्यामुळे महामंडळास गवत व्यवहारात तोटा आलेला आहे. तो तोटा खालीलप्रमाणे देता येईल.

| | | |
|---|---|---|
| अ] | खर्चाची बाजू | रु. १३०१.९७ लाख |
| ब] | जमेची बाजू | रु. ७४४.७५ लाख |
| | निव्वळ तोटा | रु. ५५७.२२ लाख |

आदिवासी विकास महामंडळास १९८७-८८ या वर्षातील गवत खरेदी विक्री व्यवहारात जवळ जवळ रु. ५.६० ते ५.७५ कोटी रुपयाची नुकसानीची झाळ लागलेली आहे. हा आकडा आदिवासी महामंडळाने त्यांच्या दिनांक १८-४-१९८९ च्या टिप्पणीमध्ये भाकितव्य केलेल्या रु. ५.५० कोटीशी मिळता जुळता आहे.

[२] "ब" पध्दत :-- व्यापारी नफा / तोटा

व्यापारी दृष्टिकोनातून या तोटयाची / नफयाची किंमत काढली तर ती खालील प्रमाणे देता येईल.

या व्यवहारात गवत भिजले नसते व ते वेळेवर विकले असते तर महामंडळास या व्यवहारात ... पासुन किती रकमेचा फायदा/ तोटा झाला असता यांचा यात विचार केलेला आहे.

गवत भिजले नसते व ते वेळेवर विकले असते तर गवत विक्रीपासुन काय नफा / तोटा होण्याची शक्यता होती, याचा अंदाज खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. नुं. | बाब | गवत मे. टनात | किमत रु. लाखात |
|---|---|---|---|
| १] | विक्री केलेले गवत | ५९, ७७५ | |
| २] | गवत खरेदीनंतर अपेक्षित घट | १७, ०३५ | |
| ३] | विकलेल्या गवतापासुन व घट विचारात घेऊन गवतापासुन एकुण मिळालेली किंमत | ७६, ८१० | ६८१. ६९ |
| ४] | शिल्लक मालाची बाजारातील सरासरी दराने, वाहतुक, आडत खर्च वजा जाता अपेक्षित किमत [रु. १२००/- प्रती मे. टन] | ४६, ७६४ | ५६१. १७ |
| ५] | सर्व गवताची सरासरी दराने येणारी किंमत [बाब ३ + बाब ४ ] | १, २३, ५७४ | १, २४२. ८६ |
| ६] | गाठी बांधणीपर्यंत महामंडळास सर्व गवतासाठी झालेला खर्च [ रु. १२६७.७७ लाख खर्च + वहातुक, विक्री, आडत व इतर बाबींवर ६३. ३९ लाख खर्च = एकुण खर्च १३३१. १६ लाख] | | १, ३३१. १६ |
| ७] | अपेक्षित कमीत कमी तोटा | | ८८. ३० |

महामंडळाने या व्यवहारास कमीत कमी अंदाजित नफा रु. २५ ते २६ लाख गृहित धरला होता. व तो अपेक्षित होता. हा नफा एकूण भांडवलाच्या २ ते ३ टक्के येतो. एवढा नफा कोणत्याही मोठ्या धंद्याच्या उलाढालीमध्ये अपेक्षित असतोच परंतु १९८७-८८ या वर्षात गवताचे भाव अवाजवी वाढवून दिल्यामुळे, व परिस्थितीत बराच बदल झाल्यामुळे दर मे. टनामागे इतर खर्चही बराच वाढला त्यामुळे व्यापारी तोटा रुपये ८८ लाख होण्याची शक्यता आहे. हा तोटा इतर तोट्यापेक्षा कितीतरी पटीने कमी आहे.

## प्रकरण - ६ वे

## पाहणीत आढळलेल्या सदृश्य बाबींचे समालोचन

### ६.१ प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळास सन १९८७-८८ वर्षात गवत एकाधिकार खरेदी योजनेत फार मोठे अपयश आले. हे अपयश का आले व त्याची कारणे कोणती ? ही योजना पुढे चालू ठेवावी किंवा ठेवू नये ? याचा निर्णय घेण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने या योजनेचे मूल्यांकन पाहणी करण्याचे आदेश संस्थेला दिले. त्याप्रमाणे या संस्थेने हे काम हाती घेतले.

या योजनेत सहभाग असलेले महत्त्वाचे घटक म्हणजे लाभार्थी व योजनेत काम करणारे अधिकारी, कर्मचारी व मार्गदर्शन करणारे सल्लागार मंडळातील सभासद ही होत. लाभार्थींना या योजनेपासून खरोखरच फायदा झाला आहे का ? या योजनेमध्ये सहभागी असलेले लाभार्थींची सामाजिक, आर्थिक परिस्थिती कशी आहे हे पण या पहाणीत लाभार्थींची निवड, निवड पध्दतीने करुन अजमावण्याचा उद्देश होता. या संबंधीची माहिती संकलित करण्याच्या दृष्टीने एक परिपत्रक तयार करण्यात आले. या परिपत्रकाचा नमुना सोबत जोडला आहे. या परिपत्रक क्र. १ मधील माहितीचे पृथःकरण करुन या माहितीचे संकलन जमातीनिहाय, तालुकानिहाय, प्रमुख व दुय्यम व्यवसायानुसार तसेच विशिष्ट बाबींवर करण्यात आले. ते भाग १ मध्ये खाली दिलेल्या तक्त्यात व विशिष्ट माहितीव्दारे प्रस्तुत केले आहे.

तसेच लाभार्थींची निवड कशी करण्यात आली हे पण सुरुवातीस दिले आहे.

६.२ <u>लाभधारकांची निवड :-</u>

ठाणे जिल्हयात डहाणू, पालघर, तलासरी, वाडा, जव्हार, मोखाडा, व शहापूर या ७ तालुक्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील गावांसाठी ही योजना १९८७-८८ या वर्षात राबविली. या क्षेत्रात गवत एकाधिकार खरेदीसाठी ११२ केंद्रे सुरु करण्यात आली होती. या ११२ केंद्रापैकी ११ केंद्रे व त्यातील १११ लाभधारकांची क्षेत्रीय पहाणी साठी निवड, निवड पध्दतीने [ ] करण्यात आली. पाहणीसाठी निवडलेली केंद्रे व त्या केंद्रामधुन निवडलेल्या लाभधारकांची संख्या खालील तक्त्यात देण्यात येत आहे.

तक्ता क्र. ६.१

पाहणीसाठी निवडलेल्या तालुकानिहाय केंद्रांची नावे व लाभधारकांची संख्या

| उपप्रादेशिक कार्यक्षेत्राचे नांव | तालुका | निवडलेल्या गवत खरेदी केंद्रांचे नांव | गवतखरेदी केंद्रावर निवडलेल्या लाभधारकांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| पालघार कासा | १] डहाणू डहाणू | १. वानगांव १ | १५ |
| | | २. आशागड | ११ |
| पालघार | २] पालघार | ३. सातिवली | ११ |
| | | ४. मान | १३ |
| कासा | ३] तलासरी | ५. आंबूलपाडा | १० |
| | | ६. बोरीगांव | ९ |
| | | ७. वडेवली | २ |
| वाडा | ४] वाडा | ८. आंबीटघार | १० |
| | | ९. कोना | १० |
| वाडा | ५] जव्हार | १०. विक्रमगड १ | ११ |
| | | ११. वडोली | ९ |
| | | एकूण | १११ |

वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, सर्व उपप्रादेशिक कार्यक्षेत्रातून गांवाची निवड झालेली आहे. एकूण ७ तालुक्यापैकी ५ तालुक्यातील गावांचा पाहणीसाठी समावेश झालेला आहे. राहिलेले २ तालुके मोखाडा व शहापूर हे आहेत. शहापूर तालुक्यातील केंद्रे ऐच्छिक तत्त्वावर निवडलेली होती. व ती फक्त दोनच होती. तसेच मोखाडयातील खरेदी केंद्रे कमी असल्यामुळे ती निवड पध्दतीत आली नाहीत.

वरील बाबींवरुन असे स्पष्ट होते की, क्षेत्रिय पाहणीसाठ निवडलेला भाग हा सर्व गवत एकाधिकार खरेदी क्षेत्राचा प्रतिक [ Representative Sample ] होता.

## ६.३ निवडलेल्या लाभार्थींचे जमाती निहाय वर्गीकरण :-

मूल्यांकन पाहणीमध्ये निवड केलेल्या लाभार्थींचे जमाती निहाय वर्गीकरण व त्याचे एकूण लाभधारकांशी शेकडा प्रमाण खालील प्रमाणे होते.

## तक्ता क्र. ६.२

### निवडलेल्या लाभार्थींचे जमातीनिहाय वर्गीकरण

| अ.क्र. | जमातीचे नांव | लाभधारकांची संख्या | लाभधारकांचे निवडीत [ In Sample ] शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | वारली | ५३ | ४८ |
| २. | कोळी मल्हार, ढोर कोळी. | २३ | २१ |
| ३. | कातकरी | -- | -- |
| ४. | कोंकणा | ११ | १० |
| ५. | धोडिया | २ | २ |
| ६. | दुबळा, ठाकूर | १४ | १२ |
| ७. | बिगर आदिवासी | ८ | ७ |
| | एकूण | १११ | १०० |

वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, एकूण १११ कुटुंबियांपैकी वारली या जमातीतील ५३ कुटुंबांचा या पाहण्यात समावेश झालेला आहे. २३ कुटुंबे कोळी मल्हार व ढोर कोळी जमातीची आहेत. कोंकणा या जमातीची ११ कुटुंबे होती. या शिवाय बिगर आदिवासी ८ कुटुंबांचा यात समावेश आहे. पण त्याचे प्रमाण फक्त ७ टक्के येवढेच आहे. कातकरी जमातीचे एकही कुटुंब पाहण्यात [ निवड पध्दतीने ] आलेले नाही.

६.४ कौटुंबिक आर्थिक स्थिती :-

कुटूंबाच्या वार्षिक उत्पन्नाची माहिती या पाहणीत गोळा करण्यांत आली. या पाहणीत आढळलेल्या दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांची संख्या खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

तक्ता क्र. ६.३

दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांची केंद्र निहाय संख्या

| अ.न. | तालुका | खरेदी केंद्राचे नांव | निवडलेल्या लाभार्थींची संख्या | दारिद्र्य रेषेखालील दूर्बल घटक असलेल्या कुटूंबांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | डहाणू | १. वानगांव | १५ | १४ |
| | | २. आशागड | ११ | ९ |
| २. | पालघर | ३. सातिवली | ११ | ९ |
| | | ४. मान | १३ | १२ |
| ३. | तलासरी | ५. जामपूळपाडा | १० | ७ |
| | | ६. बोरीगांव | ९ | ९ |
| | | ७. वडेवली | २ | २ |
| ४. | वाडा | ८. आंबीटघर | १० | ८ |
| | | ९. कोना | १० | ८ |
| ५. | जव्हार | १०. विक्रमगड | ११ | ६ |
| | | ११. वडोली | ९ | ५ |
| | | एकूण | १११ | ८९ |

जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेच्या दारिद्र्य रेषेखाली केलेल्या कुटूंबांच्या व्याख्येप्रमाणे :-

वरील पहाण्णीत असे आढळले की, १११ कुटूंबांपैकी ८९ कुटूंबे म्हणजे जवळ जवळ ८० टक्के कुटूंबे दारिद्र्य रेषेखालील होती यावरुन असे म्हणावयास हरकत नाही की, गवत एकाधिकार खरेदीमुळे बहुतांश दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाना फायदा मिळालेला आहे.

६.५ मुख्य व्यवसायानुसार लाभार्थी कुटूंबांचे वर्गीकरण :-

निवडलेल्या १११ कुटूंबांपैकी ९७ कुटूंबांचा मुख्य व्यवसाय शेती होता म्हणजे ८७ टक्के कुटूंबांचे व्यवसायाचे मुख्य साधन शेती हे आढळले. राहिलेल्या १४ कुटूंबांपैकी ३ कुटूंबांचे सालदारी व ११ कुटूंबांचे शेतमजूरी हे मुख्य व्यवसाय आढळले.

या निवडलेल्या १११ कुटूंबांचे उदरनिर्वाहाचे उत्पन्न मुख्य व्यवसायापासून फार कमी मिळत असल्यामुळे सर्व कुटूंबांना दुय्यम व्यवसायाकडे वळावे लागते. पाहण्णीत खालीलप्रमाणे दुय्यम व्यवसाय असणारी कुटूंबे आढळलीत.

| अ.नं. | दुय्यम व्यवसायाचे नांव | कुटूंबे |
|---|---|---|
| १. | शेतमजूरी | ८० |
| २. | नौकरी [सालदारी] | ७ |
| ३. | इतर किरकोळ व्यवसाय | १४ |

यावरून असे दिसते की, ब-याचशा लाभार्थींचे शेत व शेतमजूरी ही प्रमुख उदरनिर्वाहाची साधने आहेत.

६.६ कुटूंबातील मिळवत्या व्यक्ती व कुटूंबाचा आकारमान :-

निवडलेल्या भागात कुटूंबाचे आकारमान [ Family Size ] व कुटूंबातील मिळवत्या व्यक्ती याचा पण अभ्यास होण्यात आला होता तो तालुका निहाय खालील प्रमाणे आहे.

तक्ता क्र. ६.४

निवडलेल्या लाभार्थी कुटूंबाची तालुका निहाय व्यक्तीसंख्या व मिळवत्या व्यक्ती.

| अ.नं. | तालुका | कुटूंबातील एकूण व्यक्ती | कुटूंबातील मिळवत्या व्यक्ती |
|---|---|---|---|
| १. | डहाणू | १७८ | ६३ |
| २. | पालघर | १६४ | ६६ |
| ३. | तलासरी | १४२ | ६६ |
| ४. | वाडा | १३२ | ५७ |
| ५. | जव्हार | १३१ | ८० |
| | एकूण | ७४७ | ३३२ |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, पहाणीतील कुटूंबांचे सरासरी आकारमान [ ६.७३ ] ७ व्यक्तींचे आहे. व कुटूंबांतील मिळवत्या व्यक्तीचे शेकडा प्रमाण ४४.४४ आहे. महाराष्ट्र राज्याचे कुटूंबांतील मिळवत्या व्यक्तीचे प्रमाण १९८१ च्या जनगणनेप्रमाणे ३८.७१ टक्के आहे. यावरुन असे दिसते की, या भागातील कुटूंबातील मिळवत्या व्यक्तीचे प्रमाण राज्याच्या प्रमाणापेक्षा थोडेसे अधिक आहे. असे असले तरी शेकडा ८० टक्के [..] कुटूंबे दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत असताना आढळतात. शेत व शेतमजुरीपासून मिळणारे उत्पन्न त्यांना अत्यल्प असते. हे यावरुन स्पष्ट होते.

## ६.७ निवडलेल्या लाभार्थींचा शिक्षणाचा दर्जा :-

पहाणीमध्ये निवडलेल्या लाभार्थींची शिक्षण विषयक माहिती प्राप्त करुन घेण्यात आलेली आहे. ती माहिती खालील प्रमाणे आहे.

तक्ता क्र. ६.५

लाभार्थींचे शिक्षणाप्रमाणे वर्गीकरण

| अ.नं. | शिक्षणाचा दर्जा | लाभार्थींची संख्या | लाभार्थींचे एकूणाशी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | अशिक्षित | ६५ | ५९ |
| २. | ४ थी पर्यंत शिक्षण घेतलेले | ३२ | २९ |
| ३. | ५वी ते १० पर्यंत | १४ | १२ |
| ४. | दहावीच्यावर | – | – |
| | एकूण | १११ | १०० |

वरील आकडेवारीवरून असे आढळते की, १११ लाभार्थींपैकी ६५ लाभार्थी म्हणजे शेकडा ५९ टक्के लाभार्थी अशिक्षित आहेत. ३२ लाभार्थी चौथीपर्यंत शिक्षण झालेले आहे. १४ लाभार्थींचे शिक्षण फक्त पाचवी ते दहावीच्या --. आहे. व दहावीच्या वर शिक्षण असलेला एकही लाभार्थी नव्हता.

६.८ <u>वयोगटाप्रमाणे लाभार्थींचे वर्गीकरण :-</u>

लाभार्थींचे वयोगटाप्रमाणे वर्गीकरण करण्यात आले असून ते खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

तक्ता क्र. ६.६

लाभार्थींचे वयोगटाप्रमाणे वर्गीकरण

| अ. नं. | वयोगट वर्षात | निवडलेल्या लाभार्थींची संख्या |
|---|---|---|
| १. | १ ते २५ वर्षापर्यंत | २५ |
| २. | २५ ते ४५ वर्षापर्यंत | ६४ |
| ३. | ४५ ते ६० वर्षाच्या दरम्यान | १७ |
| ४. | ६० वर्षावरील वयाचे | ५ |
| | एकूण | १११ |

बहुतांशी लाभार्थींचे वय हे २५ ते ४५ वर्षे वयाच्या दरम्यान आढळले.

६.९ लाभार्थींचे पिकाखालील व गवताखालील क्षेत्र :-

पाहणीत लाभार्थी कसत असलेली जमिनीतील सर्व पीकाखालील व गवताखालील क्षेत्रासंबंधीची माहिती प्राप्त करून घेतली आहे. ही माहिती १९८७-८८ या वर्षाची आहे. ती खालील प्रमाणे तक्त्यामध्ये देण्यात येत आहे.

तक्ता क्र. ६.७

निवडलेल्या लाभार्थींची एकूण जमिन व त्या जमिनीवरील पिकाखालील व गवताखालील क्षेत्र.

[क्षेत्र एकर मध्ये]

| अ. नं. | तालुका | लाभार्थींची संख्या | लाभार्थींच्या मालकीच्या जमिनीचे क्षेत्र | सर्व पिकाखालील असलेले क्षेत्र | गवताखालील एकूण क्षेत्र | एकूण पिक व गवताखालील क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | डहाणू | २६ | ८० | २३ | २५ | ४८ |
| २. | पालघर | २४ | ८३ | ६२ | २१ | ८३ |
| ३. | तलासरी | २१ | ६२ | ३६ | २३ | ५९ |
| ४. | वाडा | २० | ६८ | ४४ | २३ | ६७ |
| ५. | जव्हार | २० | २१४ | १७६ | ३७ | २१३ |
| एकूण | | १११ | ५०७ | ३४१ | १२९ | ४७० |

निवडलेल्या १११ लाभार्थीच्या मालकीच्या जमिनीचे क्षेत्रफळ ५०७ एकर होते. त्याचे कुटूंबी जमिनीचे सरासरी क्षेत्र ४.५६ एकर येते. हे क्षेत्र २ हेक्टर पेक्षा कमी असल्यामुळे बहुतांशी लाभार्थी हे [Small farmers] लहान शेतक-यामध्ये मोडतात. लाभार्थीकडे असलेल्या ५०७ एकर क्षेत्रापैकी ३४१ एकर क्षेत्र भात, नागली, उडीद, वरई या पिकाखाली होते. तर १२९ एकर क्षेत्र गवताखाली होते. पिकाखालील व गवताखालील पिकाचे लागवडीचे प्रमाण ३:१ आहे. त्यामुळे याभागात पिकणा-या पिकापैकी गवत हे सुध्दा प्रमुख उत्पन्नाचे पीक मानावयास हरकत नाही. गवतामध्ये भातातानी, फुल, व बेर या जातीच्या गवताची लागवड केली जाते. पालघार, डहाणू, व तलासरी या तालुक्यातील गवत चांगल्या प्रकारात मोडते. तर जव्हार, मोखाडा व वाडा तालुक्यातील गवत निकृष्ट दर्जाचे समजले जात.

या भागातील उपलब्ध गवतांची वर्गवारी खालील प्रमाणे केली जाते.

| अ. नं. | गवताचा प्रकार | वर्गवारी |
|---|---|---|
| १. | उत्कृष्ट गवत | मुशी, रेहोडा, बेर. |
| २. | चांगले गवत | भोलसेल, बेरडी. |
| ३. | मध्यम गवत | फुल नं. १. |
| ४. | निकृष्ट गवत | फुल नं. २. |

## ६. १० निवडलेल्या लाभार्थींचे वार्षिक उत्पन्न :-

वरील पध्दतीची माहिती गोळा करीत असताना पहाणीमध्ये लाभार्थींच्या वार्षिक उत्पन्नाबाबतही अंदाज घेण्यात आला. हा अंदाज १९८७-८८ वर्षातील उत्पन्नाचा होता. तो खालील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे.

तक्ता क्र. ६.८

तालुका निहाय निवडलेल्या लाभार्थींचे १९८७-८८ वर्षातील उत्पन्न

| अ. नं. | तालुका | लाभार्थींची संख्या | १९८७-८८ मध्ये मिळालेले उत्पन्न [रुपयात] | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मुख्य व्यवसायापासुन | दुय्यम व्यवसायापासुन | एकुण |
| १. | डहाणू | २६ | ५६, ९०० | १, ३६, ०९० | १, ९२, ९९० |
| २. | तलासरी | २१ | ४९, ७९८ | ९८, ३८० | १, ४८, १७८ |
| ३. | जव्हार | २० | ६४, ३८३ | ८९, ९७५ | १, ५४, ३५८ |
| ४. | वाडा | २० | ७६, ७०१ | ८६, ८८३ | १, ६३, ५८४ |
| ५. | पालघर | २४ | १, १३, ७३३ | ९७, ६७५ | २, ११, ४०८ |
| | एकुण | १११ | ३, ६१, ५१५ | ५, ०९, ००३ | ८, ७०, ५१८ |

निवडलेल्या लाभार्थींचा मुख्य व दुय्यम व्यवसायाच्या उत्पन्नाची तुलना केली तर असे आढळते की, लाभार्थींना मुख्य व्यवसायापेक्षा दुय्यम व्यवसायापासुन अधिक उत्पन्न मिळालेले दिसते. येथे ज्या व्यवसायासाठी कुटूंबांनी जास्त वेळ खर्च केला असेल तो व्यवसाय मुख्य व्यवसाय गृहित धरला आहे.

मुख्य व दुय्यम व्यवसायापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण जवळपास ४ : ६ दिसते.

वरील आकडेवारी वरुन कुटूंबांचे त्या वर्षाचे सरासरी उत्पन्न रुपये ७८४२ येते. तसेच प्रति व्यक्ती प्रति महिना उत्पन्न रुपये ९७/- येते. हे जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेच्या व्याख्येनुसार दारिद्र्य रेषेवरील उत्पन्न आहे. परंतु या वर्षी गवताला जो भाव मिळाला त्यामुळे कुटूंबाच्या उत्पन्नात वाढ झालेली दिसते. वाढीव भावामुळे प्रत्येक कुटूंबाचे सरासरी रुपये १०००/- उत्पन्न वाढलेले दिसते. हे उत्पन्न कायम स्वरुपी धरता येणार नाही. वाढत्या भाव निर्देशांकाप्रमाणे या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न ही वाढलेले दिसते. वास्तवत: हे लाभार्थी अति अल्प उत्पन्न गटातीलच आहेत.

## ६.११ लाभधारकांना मिळालेल्या गवत विक्रीपासून उत्पन्न :-

निवडलेल्या लाभार्थींची सन १९८७-८८ या वर्षाच्या गवत विक्रीपासुन मिळालेल्या उत्पन्नाची माहिती मिळविण्यात आली. ही माहिती खालील तक्त्यात दर्शविलेली आहे.

### तक्ता क्र. ६.९

निवडलेल्या लाभार्थींना १९८७-८८ या वर्षात गवत विक्रीपासुन मिळालेले उत्पन्न.

| अ. नं. | तालुका | लाभार्थींची संख्या | गवत विक्रीपासुन मिळालेले उत्पन्न [रुपयात] | | | एकुण गवताचे उत्पन्न [रुपये] |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | हिरव्या गवतापासुन | वाळलेल्या गवतापासुन | जनावरासाठी व घरासाठी वापरलेल्या गवताची किंमत | |
| १. | डहाणू | २६ | – | ५१, ४०० | ३, ९५० | ५५, ३५० |
| २. | पालघार | २४ | २०० | ३०, ४४५ | २, १५० | ३२, ५९५ |
| ३. | तलासरी | २१ | ५०० | ३२, ००० | १, ७०० | ३३, ७०० |
| ४. | वाडा | २० | ६०० | २५, ४१५ | ३१२५ | २८, ५४० |
| ५. | जव्हार | २० | २०० | ३७, २८५ | ६, ५५० | ४३, ८३५ |
| | एकुण | १११ | १, ५०० | १, ७६, ५४५ | १७, ४७५ | १, ९४, ०२० |

उपरोक्त माहितीवरुन असा निष्कर्ष निघतो की, प्रत्येक कुटूंबाला सरासरी रु. १७४८ किंवा रु. १७५० च्या दरम्यान गवत विक्रीपासून लाभ झालेला आहे. हिरव्या गवतापेक्षा वाळलेल्या गवतापासून लाभार्थींना किती तरी पटीने लाभ मिळालेला आहे. जनावरांसाठी व घर छप्पर इत्यादी कामासाठी वापरलेल्या गवताची किंमत एकूण गवताच्या किमतीच्या फक्त एक टक्का आहे. यावरुन असे अनुमान काढावयास हरकत नाही की, जवळ जवळ वाया जाणा-या गवतामुळे येथील लाभार्थींना चांगले काम मिळाले आहे. व कुटूंबी रु. १७०० ते १८०० त्यांच्या वार्षिक उत्पन्नात वाढ झालेली आहे. ही वाढ जवळ जवळ एकूण उत्पन्नाच्या १/४ पट आहे.

गवताच्या निवडलेल्या १११ लाभार्थींचे १२९ एकर क्षेत्र होते. म्हणजेच एका लाभार्थीचे जवळ जवळ १.१६ एकर क्षेत्र गवताखाली होते. या १२९ एकर क्षेत्रापासून आदिवासींना/ लाभार्थींना रु. १,९४,०२० उत्पन्न मिळालेले आहे. यावरुन अंदाजित प्रती एकरी गवताचे उत्पन्न रु. १५००/- येते. हा आकडा कदाचित काही कारणामुळे जास्त असला तरी रु. १०००/- तरी कमीत कमी एकरी उत्पन्न लाभार्थींना झालेले आढळते. त्यावेळच्या गवताच्या भावाचा विचार केला तर एका एकरात १.२५ मे. टन उत्पन्न आलेले आहे असे दिसते. ते वस्तुस्थितीशी सुसंगत आहे.

## ६.१२ गवत विक्रीपासून मिळालेल्या गवताचा विनियोग :-

निवडलेल्या लाभधारकांनी गवत विक्रीपासून जे उत्पन्न मिळाले ते अनाठायी खर्च केले असे ब-याच वेळी चर्चिले जात होते. हे तपासण्याच्या दृष्टीने लाभार्थींकडून गवताच्या विक्रीच्या पैशाच्या विनियोगाची माहिती मिळविण्यात आली. ती खालील तक्त्यात देण्यात आली आहे.

तक्ता क्र. ६.१०

लाभार्थींची गवत विक्रीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा केलेला विनियोग

| अ.न. | तालुका | निवडलेल्या लाभधारकांची संख्या | १९८७-८८ वर्षामधील गवतांपासून मिळालेल्या उत्पन्नाचा विनीयाग [ लाभधारकांची संख्या ] | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | घर खर्चासाठी | शेती साठी | कौलै खरेदी करण्यासाठी |
| १. | डहाणू | २६ | २५ | ५ | २ |
| २. | पालघर | २४ | २० | ४ | ४ |
| ३. | तलासरी | २१ | १९ | – | ४ |
| ४. | वाडा | २० | १५ | ५ | ५ |
| ५. | जव्हार | २० | १२ | ६ | ५ |
| | एकूण | १११ | ९१ | २० | २० |

वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, १११ लाभार्थी पैकी ९१ लाभार्थींनी गवतापासुन मिळालेल्या ... घरखर्चासाठी विनीयोग केला आहे. २० लाभार्थींनी शेतीसाठी शेतीसाठी खर्च केला आहे. व २९ लाभार्थींनी शेती, ... घरखर्च व कौल खरेदी इत्यादी बाबींवर एकत्रित केलेला आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, लाभार्थींनी गवतापासुन मिळालेल्या पैशाचा सदुपयोगच केलेला आहे. तो खर्च अनाठायी झालेला आहे असे दिसत नाही.

## ६.१३ महामंडळाकडून राबविल्या जाणा-या इतर योजनांचा लाभार्थींनी उचललेला फायदा :-

गवत एकाधिकार खरेदी योजनेव्यतिरिक्त आदिवासी महामंडळ व महाराष्ट्र शासनाकडून ब-याच योजना आदिवासीच्या कल्याणार्थ राबविल्या जातात या योजने पैकी काही योजनेचा लाभार्थींना फायदा झाला आहे का ? हे देखील पहाण्याचा प्रयत्न पाहणीत करण्यांत आला आहे. परंतु त्यासंबंधीची माहिती मात्र फारच थोडया लाभार्थींनी पुरविली. पाहणी द्वारे या संबंधीत मिळालेली माहिती खालील तक्त्यात देण्यात आली आहे.

तक्ता क्र. ६.११

विविध विकासाच्या योजनेचा लाभार्थींना मिळालेला फायदा

| अ. नं. | योजने चांव | योजनेचा फायदा अथवा सहभाग घेतलेल्या निवडलेल्या लाभार्थींची संख्या |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | एकाधिकार व आधारभूत किंमत खरेदी योजना | १११ |
| २. | वीजपंप व ऑईल इंजिन वितरण योजना | १ |
| ३. | खावटी कर्ज वितरण योजना. | --- |
| ४. | न्युक्लिअस बजेट योजना | ५ |
| ५. | इतर योजना | ८ |

निवडलेल्या लाभार्थींना महामंडळाकडून राबविल्या जाणाऱ्या इतर योजनांचा फारसा फायदा मिळालेला दिसला नाही.

## भाग - २

६.१४ **लाभार्थी, अधिकारी व कर्मचा-याची योजनेबाबत विचारधारा**

या भागात गवत एकाधिकार खरेदी योजनेतील लाभार्थींची तसेच या योजनेत सहभागी असलेल्या सर्व स्तरावरील अधिका-याचे या योजनेबाबतची मते, व्यापारी, संचालक, मार्गदर्शक यांचे अभिप्राय व योजनेसंबंधी सर्व साधारण प्रतिक्रिया यांचा उहापोह या पाहणीत करण्यात आलेला आहे.

पहाणीत १११ लाभार्थींचा तसेच प्रमुख व्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, उपप्रादेशिक व्यवस्थापक, केंद्र प्रमुख, विपणन निरीक्षक व गोदामपाल इत्यादी ५२ अधिकारी / कर्मचा-यांचा समावेश आहे. लाभार्थींची माहिती प्रपत्र १ मध्ये तसेच अधिकारी व कर्मचा-यांची मते प्रपत्र क्र. २ मध्ये प्राप्त केली. अशा प्रकारच्या प्रपत्र क्र. २ च्या नमुन्यात घेण्यात आलेल्या माहितीचे संकलन, पृथःकरण करून सर्वाचे विचार एकत्रित मांडण्याचा प्रयत्न या भागात करण्यात आलेला आहे.

**गवत एकाधिकार खरेदी योजना फायद्याची आहे का? व ती पुढे चालू ठेवावी का ?**

गवत एकाधिकार खरेदी योजना आदिवासी, बिगर आदिवासी सर्वांना फायद्याची, त्यांच्या कल्याणाची योजना आहे. असे सर्व लाभधारक, अधिकारी, कर्मचा-यांनी मत प्रदर्शित केलेले आहे व

ती पुढे चालू ठेवावी असे सर्वांनी सुचविले आहे. यावर कोणाचे दुमत आढळले नाही.

गवत खरेदी केंद्राच्या व्यवस्थापनाबद्दल आढळलेल्या विविध बाबींचे समालोचन

६.१५ गवत खरेदी केंद्राचे अंतर सोयीचे की गैरसोयीचे ?

सध्य गवत खरेदी केंद्रे लाभार्थींना सोयीचे आहेत किंवा नाही या संबंधीचे सर्व लाभधारकांची मते अजमावण्यात आली. १११ लाभधारकांपैकी १०८ लाभधारकांनी म्हणजेच ९७ टक्के लाभार्थींना गवत खरेदी केंद्रे सोयीच्या ठिकाणी वसलेली आहेत असे मत प्रदर्शित केले. फक्त ३ लाभधारकांनी त्यात बदल असावा असे सुचविले आहे.

६.१६ गवताचे केंद्रावरील वजन व केंद्रावर लागणाऱ्या अवधीबाबत :-

सर्व लाभधारकांनी गवताचे वजन योग्य होते व तेथे जास्त वेळ थांबावे लागत नव्हते असे मत प्रदर्शित केले.

६.१७ गवताबाबतची प्रतवारी व मालाचे पैसे :-

१११ लाभधारकांपैकी १०५ लाभधारकांनी गवताचे पैसे त्वरीत दिले जातात असे प्रतिपादन केले तर ६ लाभधारकांनी मात्र १० ते १५ दिवसाचा कालावधी पैसे मिळण्यास लागतो असे सांगितले. हे लाभधारक जव्हार तालुक्यातील होते.

१११ लाभधारकांपैकी १०६ लाभधारकांनी गवताची प्रतवारी योग्य ठरविली जाते असे सांगितले आहे. त्याचप्रमाणे १११ लाभधारकांपैकी १०८ लाभधारकांनी गवताच्या प्रतवारीप्रमाणे पैसे मिळतात असे प्रतिपादन केले आहे.

६.१८ केंद्र अधिका-यांकडून आदिवासींना दिलेली वागणूक :-

शासन ही योजना जनतेसाठी राबवित असल्यामुळे तिची अंमलबजावणी होत असतांना यंत्रणेकडून आदिवासींना बरोबर वागणूक मिळते किंवा कसे हे अजमावण्यात आले. १११ लाभार्थीपैकी १०६ लाभार्थींनी चांगली वागणूक मिळते. ३ लाभार्थींनी मध्यम वागणूक मिळते तर २ लाभार्थींनी कनिष्ठ प्रतिची वागणूक मिळते असे प्रतिपादन केले.

६.१९ लाभार्थींचो गवताचे पैसे रोखीने/धनादेश द्वारे मिळण्याबाबत मतप्रणाली :-

आदिवासींना बचतीची सवय लागावी, त्यांना गवतापासुन मिळालेल्या पैशांचा अडचणीच्या वेळी उपयोग व्हावा यासाठी हे पैसे रोख न देता, ५० टक्के रक्कम रोखीने व ५० टक्के रक्कम तात्पुरती बचत म्हणून बँकेत ठेवली तर चालेल का ? या संबंधीचे लाभधारकांचे विचार घेण्यात आले. १११ लाभधारकांपैकी ९९ लाभधारकांनी या पध्दतीला नकार दर्शविलेला आहे. आर्थिक अडचणीमुळे गवत विक्रीचे पैसे त्वरित मिळण्याची त्यांची विनंती आहे.

६.२० गवत विक्रेत्यांची व्यापा-यांबाबतची मते :-

मूल्यांकन पाहणीमध्ये गवत एकाधिकार खरेदी योजना सुरु होण्यापूर्वी व्यापारी वर्गाकडून आदिवासींचा माल कसा खरेदी केला जात होता? आदिवासींना त्यांच्या मालाची योग्य किंमत मिळत होती का ? त्यांना वेळेवर पैसे मिळत होते का ? या संबंधीचे मत अजमावण्यात आले. गवत विक्रेत्यांनी जी मते प्रदर्शित केली ती खालील प्रमाणे आहेत :-

अ] १११ लाभधारकांपैकी १०४ लाभधारकांनी सांगितले की व्यापारी त्यांच्या गवताला योग्य भाव देत नव्हते.

ब] १११ लाभधारकांपैकी ८६ लाभधारकांनी असे सांगितले की, व्यापारी मालाचे वजन बरोबर करीत नव्हते. निश्चित केलेल्या भावातही बदल केला जात असे.

क] ७४ लाभधारकांनी असे सांगितले की, पैसे माल खरेदी केल्यानंतर ब-याच कालावधीनंतर देत होते. ५ लाभार्थींनी सांगितले की, पैसे वेळेवर मिळत होते. १९ लाभार्थींनी याबाबत काहीच मत प्रदर्शित केले नाही.

६. २१ विविध पातळीवरील आदिवासी महामंडळाच्या कर्मचा-यांनी व अधिका-यांनी प्रगट केलेली विविध मतप्रणाली :-

१] प्रादेशिक व्यवस्थापक, उपप्रादेशिक व्यवस्थापक व विपणन निरीक्षक यांनी वेळोवेळी केंद्रास भेट देऊन मार्गदर्शन केले पाहिजे. व निर्णय घेतले पाहिजेत. कार्यकारी संचालकांनी संबंधित अधिकारी वारंवार भेटी देऊन केंद्रांना मार्गदर्शन करतात किंवा नाही हे पाहिले पाहिजे. त्यांच्या पातळीवरील निर्णय त्यांनी त्वरीत दिले पाहिजेत.

२] केंद्रप्रमुख , विपणन निरीक्षक, प्रतवारीकार इत्यांना या कामाचे अद्यावत ज्ञान होण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणाची नितांत गरज आहे व त्यांना अल्पकाळाचे का होईना प्रशिक्षण दिले पाहिजे.

३] ही योजना कायम स्वरुपी अमलात आणावयाची असल्यास केंद्रावरील कर्मचारी, केंद्रप्रमुख, वितरण निरिक्षक, हंगामी न ठेवता शक्यतो कायम स्वरुपी [ Permanent ] असलेले नेमावेत. कर्मचारी कायम स्वरुपी असल्यास ते अधिक दक्षतेने काम करतील.

४] गवत खरेदी केंद्रावर रोख रक्कम ठेवावी लागते. ही रक्कम हजारोने असते. त्यासाठी केंद्रावरील रोखपालाला संरक्षण असणे अगत्याचे आहे. तसे संरक्षण आता नाही असे रोखपालाचे म्हणणे आहे. ब-याच वितरण निरिक्षकांकडे महामंडळाने मोटार सायकली दिलेल्या आहेत. त्यामुळे जास्त रक्कम वितरण निरिक्षकांकडे असून द्यावी. आवश्यक तेवढी रक्कमच रोखपालाने आपल्याजवळ ठेवावी. त्यामुळे रोखपालांना जी भिती वाटते ती कमी होईल व रक्कम कमी पडल्यास त्वरीत वितरण निरिक्षकाकडून घेता हि येईल.

५] गवत खरेदी केंद्राच्या आवश्यकतेनुसार कर्मचारी वर्ग वाढवावा.

६] अपघात प्रथमोपचार व आग संरक्षक साधनांची व्यवस्था शक्य झाल्यास मध्यवर्ती खरेदी केंद्रावर असावी.

७] जेथे तंबू उभारलेले नाहीत तेथे शेड्स व राहण्याची व्यवस्था कर्मचा-यासाठी करावी.

८] गवत खरेदीपूर्वी विक्रीचे अंदाज [ Objective Fore--casting ] घेतले पाहिजेत. कोणत्या भागातून गवत खरेदी करणे योग्य राहिल किंवा कसे यासंबंधी प्रथम

पहाणी [ Feasibility Survey ] करून घेतली पाहीजे.

९] विक्रीचे , उपप्रादेशिक व्यवस्थापक व गवत खरेदी केंद्र प्रमुखांनीही प्रयत्न केले पाहिजेत. त्यांना विक्री संबंधी काही अधिकार देता येतील का याचा विचार व्हावा.

१०] व्यापाऱ्यांच्या गवत खरेदीवर असलेली बंधने कडकपणे अमलांत आणावीत.

११] महामंडळाचे प्रतवारीकार कायमस्वरुपी असावेत. व त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे.

१२] महामंडळाने संपूर्ण राज्यामध्ये व राज्याबाहेरही गवताच्या मागणीप्रमाणे पुरवठा केला पाहिजे. अशा प्रकारे मागणीचा कार्यक्रम व आराखडा असणे अपरिहार्य आहे. त्याकरिता उपप्रादेशिक कार्यालयामध्ये अथवा प्रादेशिक कार्यालयाने योग्यप्रकारे नियोजन करावे.

१३] वजन करण्यासाठी सुसज्ज यंत्रे असावीत. प्रेसिंगचे कामही शक्यतो यंत्राच्या साहाय्याने करावे.

१४] गवताला वाजवी कटती ठेवावी.

१५] एका विपणन निरिक्षकास झेपेल एवढेच गवत खरेदी केंद्राच्या व्यवस्थेचे व निरिक्षणाचे कामही देण्यात यावे.

१६] गवत खरेदी केंद्रासाठी शक्यतो कायम स्वरूपी जागा मिळविण्यात याव्यात. गवत खरेदी सर्व आदिवासींना सोयीचे असेल अशा ठिकाणी असावे.

१७] पाक्षिक अथवा साप्ताहिक जाहीर लिलाव पध्दतीने गवताची विक्री उपप्रादेशिक व्यवस्थापकीय पातळीवर करण्यात यावी.

१८] गवत खरेदी केंद्रावर काम करत असतांना लहान लहान अथवा किरकोळ वस्तूंची आवश्यकता भासते. व त्या वस्तू मिळविण्यासाठ ी काल अपव्यय होतो. प्रत्येक केंद्राला शक्यतो भरपूर स्टेशनरी व योग्य साहित्याचा पुरवठा उपप्रादेशिक कार्यालयातर्फे वेळेवर करण्यात यावा. म्हणजे कोणत्याही कामास विलंब लागणार नाही.

१९] गवत खरेदी केंद्राच्या जागेची वर सुचविलेली नियोजनपूर्वक आखणी सर्वच केंद्रांना जमत नसली तरी ठराविक व प्रमुख केंद्रांना योग्य त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात म्हणजे कार्यक्षमता वाढीस लागेल.

२०] गवत खरेदीकेंद्राजवळ वावरणा-या मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावयास पाहिजे. त्याप्रमाणे प्रत्येक ग्रामपंचायतींना लेखी सूचना दिल्या पाहिजेत. व याबाबत प्रतिबंधक उपाय अमलात आणले पाहिजेत.

२१] गवत खरेदी केंद्रावर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असावी. ही व्यवस्था माणसांसाठी व जनावरांसाठी देखील असावा.

६.२२ **योजनेच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र शासनाची गतीमान भूमिका आवश्यक :-**

गवताच्या विक्रीबाबत महामंडळापेक्षा महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेऊन महामंडळाने खरेदी केलेले सर्व गवत विक्री झाले किंवा नाही हे पहावे. शासनाने राज्यातील सर्व शासकीय यंत्रणेद्वारे राज्यात व राज्याबाहेर सुध्दा खरेदी केलेले गवत विक्री होत आहे किंवा नाही हे वेळोवेळी तपासणी अपरिहार्य आहे.

गवताची खरेदी व विक्री होत असतांना एखाद्या बाहेरच्या राज्यातून जर गवत वाजवी गरजेपेक्षा जास्त येत असेल तर राज्यबंदी असणे आवश्यक आहे. तिची कडकपणे अंमलबजावणी झाली पाहिजे.

## प्रकरण - ७ वे.

## पाहणीतील निष्कर्ष व शिफारसी

७.१ पाहणीतील महत्वाची उद्दिष्टे :-

महाराष्ट्र राज्य, आदिवासी विकास महामंडळ मर्यादीत, नासिक राबवित असलेली ठाणे जिल्हयातील गवत एकाधिकार खरेदी योजना वित्तीय वर्षा १९८७-८८ मध्ये तोटयात आली.

१] योजना तोटयात आल्यामुळे पुढे ही योजना चालू ठेवावी किंवा बंद करावी.

२] चालू ठेवावयाची असल्यास तिचे स्वरूप कसे असावे.

३] मागील अनुभवावर ही योजना कशी राबविण्यास यावी.

४] योजना चांगल्या पध्दतीने राबविण्यासाठी त्याकामी काही सूचना करता येतील का?

५] ही योजना राबवितांना काही उणिवा आढळल्या का?

६] त्या आढळल्या असल्यास कोणत्या प्रकारे दूर करता येतील याबाबत सांगोपांग विचार करण्याचा या पाहणीचा मूळ उद्देश होता.

७.२ **योजना चालू का ठेवावी ? :-**

आदिवासी महामंडळ राबवित असलेली ठाणे जिल्हयातील गवत एकाधिकार खरेदी योजना आदिवासींना उपकारक नाही असे पाहण्यात आढळून आले नाही. या उलट आदिवासी व बिगर आदिवासी इतर सर्वांनी या योजनेचा पाठपुरावा केला आहे. व ही योजना बंद होता कामा नये. पुढेही चालू राहिली पाहीजे. असेच वातावरण व विचार सर्वत्र आढळले. त्यामुळे ही योजना चालू न ठेवण्याबद्दलचा प्रश्नच उद्भवत नाही. ही योजना या भागातील आदिवासी व बिगर आदिवासी शेतकऱ्यांना लाभदायकच आहे. कारण यापूर्वी जे गवत मातीमोलाने विकले जाई, त्या गवतातून संपत्ती निर्माण होते हे आदिवासींना समजले. त्यामुळे साहजिकच ही योजना सन ८८-८९ वर्षातही चालू ठेवली पाहीजे अशी सर्वत्र मागणी दिसली.

७.३ **योजनेचे स्वरुप कसे असावे :-**

ही योजना जर चालू ठेवावयाची असल्यास तिचे स्वरुप कसे असावे असा प्रश्न उद्भवतो. हया योजनेत पाच महत्वाचे टप्पे पडतात.

अ] गवताचे भाव व गवत खरेदी.

ब] गवताची वर्गवारी / प्रतवारी.

क] गासोडया बांधणे.

ड] गवताची साठवणूक [गुदाम व्यवस्था वगैरे ]

इ] विक्री व्यवस्था.

गवत खरेदी व्यवहार सुरू करण्यापूर्वी गवताच्या दराचा अभ्यास करून तो ठरविला पाहीजे व त्यानंतर गवत खरेदी केले पाहीजे. गवताचे भाव दोन दृष्टीने महत्वाचे आहेत. त्यात आदिवासींना त्याच्या मालाला चांगला भाव मिळेल व त्याबरोबरच महामंडळाला तोटा होणार नाही याची खबरदारी घेतली पाहीजे.

गवत खरेदी बरोबरच गवताची प्रतवारी, वर्गवारी केल्यास व त्याप्रमाणे गासड्या बांधल्यास गवताला बाजार मिळविणे कठिण जाणार नाही व चांगले गवत चांगल्या वाढीव दराने खुल्या बाजारात विकता येईल.

खरेदी केलेल्या गवताची गासडी बांधणे हे या योजनेतील महत्वाचे काम आहे. यासाठी आज महामंडळ पाडाप्रेस व हात प्रेसचा उपयोग करते. महामंडळाकडे ४ ...३ काही पाडा प्रेसही आहेत. महामंडळ पाडा प्रेसचे काम भाड्याने देखील करून घेऊ शकते. परंतु यातील महत्वाचा भाग म्हणजे खरेदी झालेल्या गवताच्या गासोड्या गवत खरेदी होताच, वेळीच गवत वर्गवारी करून बांधणे महत्वाचे आहे. त्या गासोड्या बांधल्यानंतर त्या सुरक्षित ठिकाणी लावल्या पाहिजेत अगर ते गवत पावसाळी हंगामासाठी साठवावयाचे असल्यास योग्य त्या गोडाऊनमध्ये वेळीच हलविले पाहिजे. म्हणजे गवतासाठी गोडाऊन व्यवस्था असली पाहिजे.

सध्या गासोडी बांधलेला माल साठविण्याची महामंडळाकडे व्यवस्था नाही. त्यामुळे भाव येईल या अपेक्षेने गोडावूनचे भाडे देऊन माल गोठवून ठेवणे फायद्याचे ठरणार नाही. थोडक्यात गवत खरेदी बरोबर गवत विक्रीची तातडीची व्यवस्था असली पाहिजे. तरच धंदा महामंडळाला फायद्याचा ठरेल.

महामंडळाकडे या कामासाठी स्वतंत्र यंत्रणा असणे जरुरीचे आहे. खरेदी यंत्रणेकडेच गासोड्या बांधण्याचे व विक्रीचे काम सोपवू नये. प्रत्येक केंद्रावर गासोड्या बांधणारी व विक्रीची यंत्रणा वेगळी असावी. विक्रीसाठी उप-विभागीय व विभागीय यंत्रणा वेगळी ठेवावी. म्हणजे तयार झालेला माल मुंबईच्या जोगेश्वरी बाजारात किंवा जवळपासच्या मोठ्या बाजारपेठेत विकता येईल.

यावरून असे सूचित करावेसे वाटते की,

१] विभागीय/उपविभागीय स्तरावर गवत विक्रीसाठी स्वतंत्र यंत्रणा असावी.

२] प्रत्येक केंद्रावर खरेदी हंगामात पुरेशी प्रतवारी करण्यासाठी व गासोडे बांधण्यासाठी लागणारी यंत्रता असावी.

३] खरेदी बरोबरच विक्रीचे व्यवहार अनुक्रमे हंगामी दिवसातही चालू ठेवण्यात यावेत.

## ७.४ गवत खरेदी महामंडळाची स्वतंत्र निर्मिती :-

आदिवासी विकास महामंडळाच्या एकूण खरेदीचे मागील पाच वर्षांची आकडेवारी खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | वर्ष | गवत खरेदी [ रुपये लाखात ] |
|---|---|---|
| १] | १९८२-८३ | १६२०.९३ |
| २] | १९८३-८४ | १९२९.८४ |
| ३] | १९८४-८५ | १५०२.४१ |
| ४] | १९८५-८६ | १४०९.९३ |
| ५] | १९८६-८७ | १५३५.०५ |
| | सरासरी वार्षिक खरेदी | १५९९.६३ |

वरील आकडेवारीवरून असे दिसते की, महामंडळाची मागील ५ वर्षातील एकूण वार्षिक सरासरी खरेदी १५९९.६३ लाख म्हणजे १६ कोटीच्या जवळपास आहे. १९८५-८६ मध्ये ३४.५४ लाख रुपयांचे गवत महामंडळाने खरेदी केले. ते गवत एकूण सरासरी वार्षिक खरेदीच्या २.१ टक्के आहे. १९८६-८७ मध्ये महामंडळाने १६६.२७ लाखाचे गवत खरेदी केले. हे या वार्षिक सरासरी खरेदीच्या १०.४० टक्के आहे. तर १९८७-८८ मध्ये महामंडळाने ८६२.२१ लाख रुपयांचे गवत खरेदी केले.

ते या एकूण सरासरी वार्षिक खरेदीच्या ५३.९० टक्के आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, महामंडळाच्या एकूण व्यापारीपैकी निम्म्याहुन अधिक व्यापार गवताचा झालेला आहे. परंतु एकूण व्यवहाराच्या मानाने महामंडळाची यंत्रणा, सामुग्री व व्यवस्थापन हे १९८७-८८ साली १० टक्के देखील कारणी पडलेले दिसत नाही. म्हणजे कामाचा किंवा खरेदीचा व्याप व साठवणूक विक्रीची व्यवस्था याचे प्रमाण व्यस्त झाल्याने महामंडळाला नुकसान सोसावे लागले आहे.

ठाणे जिल्हयातील गवत खरेदी व्यवहारामुळे महामंडळाला मोठे स्थान प्राप्त झालेले आहे. परंतु हा एवढा मोठा व्यवहार सुद्या महामंडळाला पेलवला जाण्याची शक्यता दिसत नाही. त्यासाठी --

१] गवत खरेदीसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्यात यावे. किंवा विभागीय मंडळ [ केवळ गवत खरेदी विक्रीसाठी ] स्थापन करावे त्यासाठी आवश्यक त्या कर्मचाऱ्यांसह स्वतंत्र कार्यकारी संचालकांची नियुक्ती करावी.

२] गवत खरेदी योजनेसाठी स्वतंत्र गवत खरेदी संचालक मंडळ व कार्यकारी मंडळ नेमावीत.

७.५ गवताची साठवणूक :-

बहुतांशी गवताची साठवणूक मोठया प्रमाणात करणे आर्थिकदृष्टया परवडत नाही. त्यामुळे शक्यतो एप्रिल अखेर किंवा मे च्या १५ तारखेपर्यंत महामंडळाने खरेदी केलेले गवत विकले गेले पाहिजे याची कटाक्षाने दक्षता / काळजी घेतली पाहिजे. पावसाळ्यासाठी काही गवताची साठवणूक करावयाची असल्यास ती फार थोडी असावी. खरेदी १० टक्के पेक्षा जास्त गवत पावसाळ्यातील विक्रीसाठी शक्यतो शिल्लक ठेवू नये. अशा साठवणूकीसाठी साध्यात साधी पत्र्याची शेड वजा गोडावून मध्यवर्ती व्यापारी केंद्राच्या ठिकाणी महामंडळाने उभी करावी. गोडावून उभी करण्याचा कार्यक्रम टप्याटप्याने राबविण्यात यावा.

७.६ गवताची जोगेश्वरी बाजारपेठेत खुल्या भावाने विक्री :-

आदिवासी विकास महामंडळाला गवत विक्रीचा प्रश्न फार मोठ्या प्रमाणात भेडसावतो. योगायोगाने गवत खरेदी केंद्रांना जवळच मुंबईची मोठी बाजारपेठ लाभली आहे. तेथे दररोज शेकडो टन गवत लागते. व ते सहज विकले जाते. उघाडया बाजारपेठेत महामंडळाला माल विकण्यास बिलकुल हरकत नसावी असे वाटते महामंडळाने हा माल जोगेश्वरी बाजारात विक्रीस आणला तर त्या मालाची बाजारपेठेतील किंमत ताबडतोब समजते आणि त्यामुळे गवताचा भाव निश्चित करण्यात त्याचा उपयोग होतो म्हणून काही नमुने तरी जोगेश्वरीच्या बाजारात विकणे आवश्यक आहे.

या दृष्टीने तसा प्रयत्न महामंडळाकडून झालेला दिसत नाही. व झाला असल्यास तो जास्तीत जास्त व्हावा असे सूचित करावेसे वाटते.

७.७ घाऊक व ठोक विक्री केंद्रे सुरु करणे :-

महामंडळाकडील गवत नियमित विक्रीसाठी महामंडळाने कायम स्वरूपाची काही विक्री केंद्रे [ घाऊक व ठोक ] स्थानिक पातळीवर व मुंबईला सुरु करावीत म्हणजे महामंडळाचा खरेदी केलेल्या मालाला बाजारपेठ चांगली मिळेल व खरेदीचा बराचसा माल मुंबईच्या बाजारपेठेत व स्थानिकरित्या विकला जाईल.

७.८ ना नफा/ ना तोटा तत्वावर सहकारी संस्थांना गवत वाटप :-

महाराष्ट्रात बरेचसे सहकारी तत्वावर चालणारे दूध प्रकल्प दुग्ध सहकारी संस्था आहेत अशा दुग्ध सहकारी संस्थांना ना नफा ना तोटा किंवा अत्यल्प प्रमाणांत नफा आकारुन कायमस्वरुपी गवत देण्याची व्यवस्था करण्यास हरकत नाही. अशा संस्थांना पतीवर संस्थांची परतफेडीची पात्रता जाणून, काही प्रमाणांत पतीवर माल देण्यास हरकत नसावी. अशा प्रकारची कायमस्वरुपी गवताची गि-हाईके महामंडळाला मिळाली तर गवत विक्री किंवा शिलकीचा प्रश्न रहाणार नाही. तसेच इतर राज्यातील शासकिय/ निमशासकिय, सहकारी संस्थांची संपर्क साधून आपल्या राज्यातील महामंडळाने खरेदी केलेल्या गवत विक्रीचा प्रयत्न करण्यात यावा.

७.९ पेपर मोल/पुठ्ठा पॅकिंग मटेरियलचा नवा प्रकल्प सुरु करण्याबाबत :-

महामंडळाकडे असलेले बरेचसे गवत या ना त्या कारणाने वाया जाण्याची शक्यता असते अशा वाया जाणाऱ्या गवताचा चांगला उपयोग होण्यासाठी महामंडळाने पेपर मोल, पुठ्ठा किंवा पॅकिंग मटेरिअलसाठी एखादा प्रकल्प हाती घेतला तर तो चांगला चालण्यासारखा आहे. म्हणून महामंडळाने पेपर मोल, पुठ्ठा किंवा पॅकिंग मटेरिअलचे साहित्य तयार करण्याचा प्रकल्प हाती घ्यावा म्हणजे नासधुस झालेल्या गवताचा, हलक्या प्रतीचा गवताच्या विक्रीचा प्रश्न रहाणार नाही.

७.१० विक्रीसाठी एजंट / सब एजंट नियुक्ती :-

महामंडळाने मालाची विक्री करण्यासाठी एजंट किंवा सब-एजंट नेमावे. म्हणजे त्यांच्या मार्फतही बराचसा माल विकला जाईल. स्थानिक पातळीवर व्यापाऱ्यांना माल देण्याची पध्दत सुरु केली तर बराचसा माल केंद्रावर विकला जाण्याची शक्यता आहे.

७.११ गवतापासुन सुग्रास खाद्य तयार करणे :-

कडब्यापासुन त्यांचा तुकडा करुन ढेप व इतर सात्विक पदार्थ मिसळून जनावरांचे उत्तम खाद्य तयार करण्याची पध्दत आपल्याकडे व परप्रांतातही आढळते. त्याच तत्वावर गवतापासुन जनावरांचे उत्कृष्ट सुग्रास खाद्य तयार करता येईल का ? याबाबत विचार व्हावा.

व असा प्रकल्प हाती घ्यावा म्हणजे गवतापासून गासोडया बांधण्याचे श्रमही वाचतील व जनावरांना त्यांचे खाद्य चांगल्या स्वरुपात पुरविता येईल.

सारांश :-

वरील सर्व बाबी विचारात घेतल्या तर महामंडळाला हा व्यापार अतिशय नफा देणारा आढळेल. मालाच्या विक्रीचा प्रश्न राहणार नाहीआणि महाराष्ट्रातील अधिकाधिक भाग या योजनेखाली आणता येईल. महामंडळाला ठाणे जिल्हयातील उपयोजना क्षेत्रातील भाग या योजनेखाली घेता येईल असे नव्हे तर पालघर तालुक्यातील काही भागातून चोरटी निर्यात होते ती पालघार संपूर्ण तालुका या योजनेखाली घेता येईल. थोडक्यात या जिल्हयातील राहीलेला भाग व इतर जिल्हयातील गवत उत्पादक तालुक्यांचाही समावेश करता येईल. ही योजना महामंडळाला नुसती नफा देणारीच ठरणार नाही तर महाराष्ट्र राज्याला वरदान देणारीच ठरेल . वरील विश्लेषणावरुन असे स्पष्ट होते की, महाराष्ट्र राज्यात राबवीत असलेली गवत एकाधिकार खरेदी योजना राबविणाऱ्या यंत्रणेच्या कौशल्यावर व त्याच्या व्यापारी दृष्टीकोनावर व निर्लोभी सेवेवर अवलंबून आहे.

पर्यायी व्यवस्था :-

वरील सर्व बदल किंवा वाढ तांत्रिक कारणामुळे शक्य नसल्यास गवत खरेदी योजना, एकाधिकार पध्दतीने राबवावयाची नसल्यास याला पर्यायी मार्ग कोणता हा प्रश्न उपस्थित होतो. त्यास खालीलप्रमाणे पर्यायी मार्ग सुचविता येईल.

अ] लहान प्रमाणात योनजा राबविणे :-

अ] ही योजना लहान प्रमाणांत राबविण्यात यावी. परंतु ज्या विभागात दर्जेदार गवत येते असे दोन तालुके प्रथम एकाधिकार खरेदी योजनेखाली घ्यावेत. तेथील गवत खरेदी करुन तसेच माल एप्रिल अखेर विकण्याचा प्रयत्न करावा. न विकलेल्या मालाची १५ मे पूर्वी साठवणूक करावी. साठवणूक व विक्रीची व्यवस्था जसजशी वाढेल तसतसे हळूहळू गवत एकाधिकार खरेदीचे क्षेत्र वाढवावे.

किंवा

ब] हमी किमतीने माल खरेदी करणे :-

ब] शासनाने गवताची हमी किंमत [ Support Price ] निश्चित करावी व या हमी किंमतीखाली जेवढा माल विकला जात असेल तेवढा तो महामंडळाने ही किमतीच्या दराने खरेदी करावा.

किंवा

क] गवत विक्रीची शक्यता फारच कमी आढळत असेल तर आदिवासींचा माल जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या दराने काही ठराविक तालुक्यातून खरेदी **करण्यात यावा • इतरांचा माल** विकत घेऊ नये.

इतर सूचना :-

अ] सन १९८७/८८च्या गवत हंगामापेक्षा चालू वर्षाच्या १९८७-८८ च्या गवत हंगामात गवताला टनामागे रुपये ५० ते १०० ने वाढवून देण्यात आला आहे. हा भाव वाढवून देण्यामागे विशेष काहीही कार्य कारण भाव दिसत नाही. उलट १९८७-८८ या वर्षामध्ये गवताचे पीक भरघोस आलेले होते. म्हणून सन १९८६-८७ पेक्षा हे भाव दर टनामागे कमी असावयास पाहिजे होते; तसे मात्र प्रत्यक्षात झालेले नाही. त्यामुळे आदिवासी विकास महामंडळाला गवताच्या खरेदीत सुमारे १ ते १।। कोटी रुपये अधिक मोजावे लागले. त्यामुळे तोट्याचे प्रमाणही वाढलेले आहे.

गवताचे भाव वाढवून देण्याबाबतचा प्रस्ताव संचालक मंडळात किंवा कार्यकारी समितीच्या सभेत मंजूर झाल्याचे आढळून आले नाही. भाववाढ संचालक मंडळ किंवा कार्यकारी समितीच्या संमतीने समजा झाली असली तरी भाववाढीची कारणमिमांसा कोणीही देऊ शकला नाही. गवताचा भाव निश्चितकरतांना गवताची उपलब्धता, गवताचा चालू हंगाम, विक्रीची शक्याशक्यता या सर्व मुद्दयांचा सांगोपांग विचार संचालक मंडळात झाल्याचे चर्चेत आढळून आले नाही. सर्व ठिकाणी सर्व प्रतीच्या मालाला, गवताला एकच भाव निश्चित करण्याचे धोरण व्यापारी धोरणा-या विरुध्द आहे. प्रथात गवताला जास्त भाव देऊन महामंडळाला फायदा झाला तर आदिवासी शेतक-यांना व गवत उत्पादकांना त्याप्रमाणात वाढीव रक्कम [बोनस] देण्याचाही विचार व्हावा.

ब] गवताला भाव निश्चित करतांना, गवत उत्पादित करणा-या भागाचा व गवताचा प्रकाराच्या विचार होणे आवश्यक आहे. मोखाडा व वाडा या भागातील गवत तलासरी, डहाणू व पालघर भागातील गवतापेक्षा जास्त प्रतीचे असते. मग त्याचा दर सारखा ठेवण्याचा महामंडळाचा स्पष्ट होत नाही. मालाच्या दर्जानुसार दराचे फरक हा व्यापारी दृष्टीकोन महामंडळाने स्विकारलेला नाही. केंद्रावरील गवत खरेदीचा दर ठरवितांना, मध्यवर्ती विक्री केंद्रांचे अंतर, वाहतुकीची उपलब्धता याचा विचार होणे जरुरीचे आहे. तसेच तालुका निहाय गवताचे भाव निश्चित करणे आवश्यक आहे.

## ७. १३ प्रतवारीप्रमाणे गवताचे वर्गीकरण :-

गवताला चांगला भाव मिळण्याच्या दृष्टिने गवत प्रतवारीप्रमाणे लावणे फार आवश्यक असते. काही हलक्या गवताच्या मिश्रणामुळे ब-याच वेळा चांगल्या गवताच्या भावाच्या बाबतीत मार खावा लागतो. खरेदी केंद्रावर गवताची प्रत वारी बरोबर लावली जात नाही. व त्यामुळे मोठ्या बाजारात आदिवासी महामंडळाच्या मालाला चांगला भाव मिळत नाही. असे सत्य पाहण्यात आढळले आहे. त्यामुळे असे सुचवावेसे वाटते की, प्रतवारी प्रमाणे गवत लावण्यात यावे. व त्याप्रमाणे गासडया बांधाव्यात

## ७१४ गवताचे पैसे चेकव्दारे व हप्त्याने देण्याची पध्दत :-

गवत उत्पादक आदिवासींना व इतरांना गवताचे पैसे रोख देण्याची सध्या प्रचलित पध्दत आहे. आदिवासींना गवताचा जो पैसा मिळतो त्याचा विनियोग ते त्यांच्या सवयीनुसार करतात. असे निदर्शनास आले आहे त्यामुळे ही योजना आदिवासी कुटूंबांच्या आर्थिक उध्दारासाठी फायद्याची व्हावयास पाहीजे. तितकी ती फायद्याची झालेली दिसत नाही. रोख पैसे वाटतांत अनेक घोटाळे होण्याचीही शक्यता असते. ती कशी कमी करता येईल व ... शेतकऱ्यांना ठराविक रकमेच्या वरची रक्कम चेकव्दारा देता येईल काय याचा विचार करावा. त्यामुळे बचतीची सवय वाढीला लागेल.

१] आज आदिवासीमध्ये बचतीची सवय अगदीच अल्प प्रमाणात आहे. पैसा बचत न करता आलेला सर्व पैसाउधळण्याची सवय मोठ्या प्रमाणावर आहे.

२] ज्यांना या योजनेव्दारे चांगला पैसा मिळत आहे त्यांच्याकडे शिल्लक मात्रा काहीही दिसत नाही. त्यामुळे असे सुचवावेसे वाटते की, गवताचा पैसा देताना तो चेकव्दारे द्यावा. व काही रक्कम बचत करायचास सुचवावे त्यामुळे आदिवासींना पावसाळ्यात पोटगीसाठी जे हात पसरावे लागतात किंवा त्यांना सावकाराकडे जावे लागते ते जावे लागणार नाही व ते या पैशाचा उपयोग गरजेनुसार करू शकतील.

३] पैसा हातात रोख नसल्यामुळे व्यसनासाठी जो खर्च होतो तो टळण्याची शक्यता वाढेल.

४] आदीवासी महामंडळाची वसुली या पैशाबरोबरच लावावी म्हणजे महामंडळाची वसुली ही चांगल्या रितीने होऊ शकेल व आदिवासी काही प्रमाणात कर्ज मुक्त होतील आदिवासींमध्ये बचतीची सवय त्यामुळे वाढीला लागेल.

७, १५ <u>खरेदी केंद्रास जोडलेल्या गावांची पुर्नरचना :-</u>

ब-याच उपकेंद्रावरुन गवत खरेदी केंद्राच्या संख्येत वाढ करण्याबाबतच्या सूचना आलेल्या आहेत. सध्या ठाणे जिल्ह्यात गवत एकाधिकार खरेदी योजनेखाली ११२ खरेदी केंद्रे आहेत. या ११२ खरेदी केंद्रावर १९८७-८८ या वर्षात १, २३, ५७५ मे. टन.

गवत खरेदी झालेली आहे. यावरुन एका केंद्रावर १०८४ म्हणजे ११०० मे. टनाच्या जवळपास सरासरी गवत खरेदी केले जाते. असा निष्कर्ष निघतो. कामाचे कमीत कमी ११० दिवस धरले तर दर दिवशी १० मे. टन गवत खरेदी केले जाते हे स्पष्ट होते. हे खरेदीचे एका केंद्राचे प्रमाण फार मोठे आहे असे नाही.

या बाबत असे सुचवावेसे वाटते की, खरेदी केंद्रे न वाढविता प्रत्येक गांवाची सखोल पडताळून पहावी व ज्या ठिकाणी गवताची आवक जास्त आहे अशा केंद्रावरील गावे कमी करुन ती जवळपासच्या कमी आवक असलेल्या खरेदी केंद्राला जोडावीत . वहातुकीची साधने व सोयी लक्षात घेऊन करावे. खरेदी केंद्रे वाढवून ते किफायतशीर होतील का ? लोकांच्या सोयीच्या दृष्टिने खरेदी केंद्र वाढविणे आवश्यक आहे का ? याचा विचार करुन आदिवासी महामंडळाने यासंबंधी अंतिम निर्णय घ्यावा.

७.१६ <u>उत्कृष्ट प्रतीच्या गवताचे क्षेत्र वाढविण्याकडे कल / दृष्टिकोन :-</u>

उत्कृष्ट प्रतीचे गवताचे उत्पादन वाढविण्याकडे दृष्टिकोन [ Replacement of Local Variety by Improved or high grade variety] ठाणे जिल्हयात काही भागात हलक्या प्रतीच्या गवताचे उत्पादन होते. या गवताच्या बियाण्यात बदल घडवून आणून चांगल्या दर्जाच्या गवताचे उत्पादन करता येईल का ? याचा देखील विचार आदिवासी विकास महामंडळाने

व शेती व वन खात्याने एकत्रित बसून केला पाहिजे. याबाबत असे समजते की, बेल ही गवताची चांगली जात आहे. या गवताला आपल्या भागात चांगली मागणी आहे. गवताचे उत्पादन या भागात होऊ शकेल. परंतु त्याच्या उत्पादनासाठी चांगली जमिन लागते. अशी चांगली जमिन जेथे असेल तेथे हे गवत घेण्याचा विचार करावा. तरी वाडा तालुक्यात बेल जातीच्या उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे.

७.१७ महामंडळाच्या प्रशासन सुधारण्याबाबतच्या काही शिफारशी :-

१] आदिवासी महामंडळ महाराष्ट्र राज्यातील आदिवासींसाठी एकमेव व महत्त्वाची व्यापारी संस्था असल्यामुळे तिने चांगल्या कामाचा पायंडा [ Proper System Development ] पाडला पाहिजे. आदर्श उदाहरणे दाखविली पाहिजेत.

२] प्रादेशिक व्यवस्थापक, उपप्रादेशिक व्यवस्थापक व विपणन यांनी वेळोवेळी केंद्रास भेट देऊन मार्गदर्शन केले पाहिजे व निर्णय घेतले पाहिजेत. कार्यकारी संचालकांनी संबंधित अधिकारी वारंवार भेटी देऊन केंद्रांना मार्गदर्शन करतात किंवा नाही हे पाहीले पाहिजे. त्यांच्या पातळीवरील निर्णय त्यांनी त्वरीत दिले पाहिजेत.

३] केंद्रप्रमुख , विपणननिरिक्षक, प्रतवारीकार ह्यांना या कामाचे अद्यावत ज्ञान होण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणाची नितांत गरज आहे व त्यांना अल्पकाळाचे का होईना प्रशिक्षण दिले पाहिजे.

४] ही योजना कायम स्वरूपी अमलात आणावयाची असल्यास केंद्रावरील कर्मचारी, केंद्रप्रमुख, विपणन निरिक्षक हंगामी न ठेवता शक्यतो कायमस्वरूपी [ Permanent ] असलेले नेमावे. कर्मचारी कायम स्वरूपी असल्यास ते अधिक दक्षतेने काम करतील.

५] गवत खरेदी केंद्रावर रोख रक्कम ठेवावी लागते. ही रक्कम हजारोने असते. त्यासाठी केंद्रावरील रोखपालाला संरक्षण असणे अगत्याचे आहे. तसे संरक्षण आता नाही असे रोखपालाचे म्हणणे आहे. ब-याच विपणन निरिक्षकांकडे महामंडळाने मोटारसायकली दिलेल्या आहेत. त्यामुळे जास्त रक्कम विपणन निरिक्षकाकडे असू द्यावी. आवश्यक तेवढी रक्कमच रोखपालाने आपल्याजवळ ठेवावी. त्यामुळे रोखपालांना जी भिती वाटते ती कमी होईल व रक्कम कमी पडल्यास त्वरीत विपणन निरिक्षकाकडून घेताही येईल.

६] गवत खरेदी केंद्राच्या आवश्यकतेनुसार कर्मचारी वर्ग वाढवावा.

७] अपघात, प्रथमोपचार व आग संरक्षक साधनांची व्यवस्था शक्य झाल्यास मध्यवर्ती खरेदी केंद्रावर असावी.

८] जेथे तंबू उभारलेले नाहीत तेथे शेड्स व राहण्याची व्यवस्था कर्मचा-यांसाठी करावी.

९] गवत खरेदीपूर्वी विक्रीचा अंदाज [ Objective Fore--casting ] घेतले पाहीजेत.

१०] विक्रीचे उपप्रादेशिक व्यवस्थापक व गवत खरेदी केंद्रप्रमुखांनी प्रयत्न केले पाहिजेत.

११] व्यापा-यांच्या गवत खरेदीवर असलेली बंधने कडपकपणे अमलात आणावीत.

१२] महामंडळाचे प्रतवारीकार कायमस्वरुपी असावेत व त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे.

१३] महामंडळाने संपूर्ण राज्यामध्ये व राज्याबाहेरही गवताच्या मागणीप्रमाणे पुरवठा केला पाहिजे. अशा प्रकारे मागणीचा कार्यक्रम व आराखडा असणे अपरिहार्य आहे. त्याकरीता उपप्रादेशिक कार्यालयामध्ये अथवा प्रादेशिक कार्यालयाने योग्य प्रकारे नियोजन करावे.

१४] वजन करण्यासाठी सुसज्ज यंत्रे असावीत. प्रेसिंगचे कामही शक्यतो यंत्राच्या सहाय्याने करावे.

१५] गवताला वाजवी कटती ठेवावी.

१६ ] गवत खरेदी केंद्रासाठी शक्यतो कायमस्वरूपी जागा मिळविण्यात याव्यात. गवत खरेदी त्या भागातील सर्व आदिवासींना सोयीचे असेल असे ठिकाण असावे.

१७ ] पाक्षिक अथवा साप्ताहिक जाहीर लीलाव पध्दतीने गवताची विक्री उपप्रादेशिक व्यवस्थापकीय पातळीवर करण्यात यावी.

१८ ] गवत खरेदी केंद्रावर काम करत असतांना लहान सहान अथवा किरकोळ वस्तूंची आवश्यकता भासते व त्या वस्तु मिळविण्यासाठी काल अपव्यय होतो. प्रत्येक केंद्राला शक्यतो भरपुर स्टेशनरी व योग्य साहित्याचा पुरवठा उपप्रादेशिक कार्यालयातर्फे वेळेवर करण्यात यावा. म्हणजे कोणत्याही कामास विलंब लागणार नाही.

१९ ] गवत खरेदी केंद्राच्या जागेची वर सुचविलेली नियोजनपूर्वक आखणी सर्वच केंद्रांना जमत नसली तरी ठराविक व प्रमुख केंद्रांना योग्य त्या सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. म्हणजे कार्यक्षमता वाढीस लागेल.

२० ] गवत खरेदी केंद्रानजिक वावरणाऱ्या मोकाट जनावरांचा बदोबस्त करावयास पाहिजे. त्याप्रमाणे प्रत्येक ग्रामपंचायतींना लेखी सूचना दिल्या पाहिजेत. व या बाबत प्रतिबंधक उपाय अमलात आणले पाहिजेत.

२१] एका विपणन निरिक्षकास सोपेल एवढेच गवत खरेदी केंद्राच्या व्यवस्थेचे व निरीक्षणाचे काम देण्यात यावे.

२२] गवत खरेदी केंद्रावर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असावी. ही. व्यवस्था माणसांसाठी व जनावरांसाठी देखील असावी.

<u>योजनेच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र शासनाची गतीमान भूमिका आवश्यक :-</u>

२३] गवताच्या विक्रीबाबत महामंडळापेक्षा महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेऊन महामंडळाने खरेदी केलेले सर्व गवत विक्री झाले किंवा नाही हे पहावे. शासनाने राज्यातील सर्व शासकिय यंत्रणेद्वारा राज्यात राज्याबाहेर सुध्दा खरेदी केलेले गवत विक्री होत आहे किंवा नाही हे वेळोवेळी तपासणे अपरिहार्य आहे.

२४] गवताची खरेदी व विक्री होत असतांना एखाद्या बाहेरच्या राज्यातून जर गवत वाजवी गरजेपेक्षा जास्त येत असेल तर राज्यबंदी असणे आवश्यक आहे. तिची कडकपणे अंमलबजावणी झाली पाहीजे.

क] काही महत्वाच्या सूचना :-

भाजीपाला लागवड, फलोद्यान व वनशेतीकडे आदिवासी शेतकऱ्यांना प्रवृत्त करणे :-

गवत एकाधिकार खरेदीने आदिवासी शेतकऱ्याच्या वाया जाणाऱ्या गवताला आपण किंमत देतो. त्या निमित्ताने आदिवासी शेतकऱ्यांना रोजगार मिळतो. त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्या साठी शासन हातभार लावते. हे जरी खरे असले तरी आदिवासींना स्वत:च्या पायावर उभे करण्याचे स्वप्न या पध्दतीने साकार होईल का ? असा प्रश्न आपल्यासमोर उभा रहातो. त्याचे उत्तर आपणास नकारार्थीच मिळते. त्यासाठी आपण काय केले पाहिजे. हाही प्रश्नच आहेच. आदिवासींकडे असलेल्या गवत उत्पादीत क्षेत्रात गवताऐवजी अधिक उत्पादन देणाऱ्या दुसऱ्या उत्पादनाचा विचार करता येईल का ? गवताला दुसरे पर्यायी अधिक उत्पन्न देणारे पिक कोणते ? दुसऱ्या पर्यायी पिकाबद्दल आदिवासींची आवड निवड काय आहे ? त्यांची तांत्रिक क्षमता काय आहे याचाही विचार होणे जरुरीचे आहे.

ठाणे जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रांत फलोद्यानाला बराच वाव असल्याचे आढळले आहे. या भागातील चिक्कू व आंब्याच्या बागा प्रसिध्द आहेत. त्यासाठी आदिवासींच्या गवत जमिनीचे चिक्कू, आंबा, किंवा इतर

फळफळावळच्या बागेत रूपांतर करता येईल का ? याचा विचार करावा का ? हा विचार करतांना आदिवासींच्या कंटाळ्य अडचणी कोणत्या ? व त्या कोणत्या पध्दतीने सोडविल्या पाहिजेत. जेणे करुन आदिवासी शेतकरी हा बदल करु शकेल ? त्यासाठी तो प्रयत्न करेल याचा विचार संबंधित खात्याने करणे आवश्यक आहे असे वाटते.

या संदर्भात या संस्थेने घेतलेल्या फलोद्यान पाहणीच्या आधारावर असे सुचवावेसे वाटते की, ठाणे जिल्हयातील आदिवासी शेतकरी फलोद्यानाकडे झुकत आहेत. त्यांना त्याची आवड निर्माण झाली आहे. परंतु खालील बाबींमुळे त्यात त्यांना फारसे यश आलेले दिसत नाही

१] फळझाड लागवडीचे तंत्रज्ञ.

२] फळझाडे लावण्यासाठी / वाढविण्यासाठी लागणा-या झाडांची सहज . उपलब्धता.

३] फळबागेला पाण्याची वेळेवर उपलब्धता.

४] बेवारसी जनावरांपासुन फळबागेचे संरक्षण.

वरील [१]ते [३] बाबींसाठी शासनाकडून पूर्तता केली जाते. परंतु ती ज्या प्रमाणांत ज्या कालावधीत पाहिजे त्या प्रमाणांत कालावधीत केली जात नाही. या संबंधीच्या सध्या राबवीत असलेल्या योजना विस्तृत प्रमाणांत व कालबाहय राबविल्या तर बराच बदल होण्याची शक्यता आहे.

त्यासाठी आदिवासींना फळबागांचे वनशेती व भाजीपाला लागवडीचे तंत्रज्ञान अवगत करुन दिले पाहिजे. त्यांना आर्थीक सहाय्य, तांत्रिक मार्गदर्शन मोठ्या प्रमाणात उपलब्ध करुन दिले पाहिजे. बागायती क्षेत्रासाठी अनुदान / कर्ज वेळेवर उपलब्ध करुन दिले पाहिजे. मोकाट जनावरांपासुन फळबागांचे संरक्षणासाठी योजना तयार केल्या पाहिजेत. त्यांना यासाठी भांडवलाची सहज उपलब्धता कशी होईल हे प्रकल्प अधिकारी [ ए.आ. वि.प्र. ] व आदिवासी विकास अधिका-यांनी पाहिले पाहिजे. फळबागांसाठी नेमलेल्या माळ्यांनी सतत आदिवासी शेतक-यांबरोबर संपर्क साधला पाहिजे. त्यांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या कामासाठी स्वयंसेवी संस्थांचा कसा सहभाग साधता येईल याचाही विचार होणे आवश्यक आहे.

निुयुक्तीवर असलेल्या अधिका-याबाबत :-

मुलकी, सहकारी खात्याचे प्रतिनिधी म्हणून महामंडळाकडे काहि अधिकारी काम करीत आहेत. या महामंडळाच्या अधिकाऱ्यांचे असे मत आहे की, वरिष्ठ पातळीवर आदिवासी विकास महामंडळाच्या अधिका-यांची नियुक्ती झाली पाहिजे. नियुक्तीवर असलेले अधिकारी वरिष्ठ पदावर नेमू नयेत. इतर खात्याचे अधिकारी जेवढ्या दक्षतेने व जबाबदारीने काम करावयास पाहिजे त्या दक्षतेने, जबाबदारीने ते काम करीत नसल्यामुळे महामंडळ तोट्यात येते. त्यासाठी इतर खात्यातील अधिका-यांची या महामंडळात नियुक्ती करु नये.

या संबंधित या संस्थेचे असे मत आहे की, जबाबदारीने, दक्षतेने काम करणे या गोष्टी तेथे काम करणा-या व्यक्तीवर अवलंबून असतात. त्या खात्यावर अवलंबून नसतात. आदिवासी महामंडळाकडे जोपर्यंत संबंधित तंत्रज्ञान जाणणारे तंत्रज्ञ नाहीत तो पर्यंत इतर खात्याकडून अनुभवी, जबाबदार व दक्ष अधिका-यांना घेण्यास हरकत नाही. एकदा महामंडळाकडे संबंधित तज्ञ अधिकारी तयार झाल्यानंतर नियुक्तीवरील अधिका-यांना परत पाठविले तरी चालण्यासारखे आहे.

याबाबत असे सुचवावेसे वाटते की, वेगवेगळ्या खात्याकडून तज्ञ अधिकारी घेतांना अनुभवी, जबाबदार व दक्ष अधिका-यांचीच मागणी संबंधित खात्याकडून करावी. खात्याने नियुक्तीवरील अधिका-यांना परत पाठविण्यापूर्वी त्या शाखेचे तज्ञ अधिकारी तयार करून द्यावेत.

## परिशिष्टे

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हयात सहकारी आदिवासी विकास महामंडळातर्फे राबविण्यात येत असलेल्या गवत एकाधिकार खरेदी योजनेबाबतची मूल्यमापन पाहणी-१९८८

### प्रपत्र क्र. १

### लाभधारकांची माहिती

### चौक क्र. १

### सर्वसाधारण माहिती

१. गवत खरेदी केंद्राचे नाव .........[ ] [२] तालुका ........[ ]

३. गांवाचे नांव ..... [ ] [४] पाडयाचे नांव .......... [ ]

५. लाभधारकांचे नांव .........[६] निवड क्र. ............. [ ]

लाभधारक आदिवासी [१] बिगर आदिवासी [२]

७. आदिवासी जमातीचे नांव ................. [ ]

८. वय .......

९. शिक्षण .......

१०. कुटूंबातील एकूण व्यक्ती ....... [ ]

११. कुटूंबातील मिळवत्या व्यक्ती ........ [ ]

१२. लाभधारक दारिद्र्य रेषेखालील दुर्बल घटक आहे काय ? होय [१] / नाही [२]

१३. मुख्य व्यवसाय कोणता ........... [ ]

१४. दुय्यम व्यवसाय असल्यास कोणता ........... [ ]

१५. वार्षिक उत्पन्न रुपयात.

[अ] मुख्य व्यवसायापासून [ ]

[ब] दुय्यम व्यवसायापासून [ ]

[क] एकूण [ ]

१६. लाभधारकाकडे किती जनावरे आहेत – गाई [ ] म्हशी [ ]
इतर [ ] एकूण [ ]

चौक क्र. २.

शेती विषयक माहिती [ क्षेत्राचे आकडे एकरात ]

| | स्वत:ची | खंडाची | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|
| १७. लाभार्थीच्या मालकीची एकूण जमिन. | | | | |

१८. १९८७-८८ वर्षातील महत्वाच्या पिकाखालील क्षेत्र [१]..........[२]............
[३]..........[४]............

१८. अ] गवताखाली क्षेत्र .......... [ ]
ब] गवताचा प्रकार/जात .......... [ ]

| | हिरव्या गवता गवतापासून | वाळलेल्या गवतापासून | एकूण |
|---|---|---|---|
| १९. गवत विक्रीपासून येणारे उत्पन्न [ रुपयांमध्ये ] | | | |
| एकूण उत्पन्न | | | |

२०. अ] विक्री करुन घराच्या उपयोगासाठी आणलेले गवत

| | जनावरांसाठी | इतर कारणास्तव झोपडी बांधणी इ. | एकूण |
|---|---|---|---|
| [अ] क्विंटलमध्ये | | | |
| "ब] किंमत [ रु. त ] | | | |

२१. कुटुंबातील माणसे इतर मजुरी अथवा व्यवसाय करीत असतील तर त्यापासून त्यांना मिळणारे उत्पन्न [ रुपयांमध्ये ]

२२. १९८७-८८ मध्ये गवत पिकांसाठी तुमचा किती खर्च झाला ?
[ स्वत:ची मजुरी सोडून ]

चौक क्र. ३.

२३. गवत एकाधिकार खरेदी योजना व आदिवासी उपयोजना क्षेत्रातील इतर योजनापासुन मिळालेले सहाय्य/ मदत.

[ रुपयांत ]

आदिवासी महामंडळातर्फे राबविण्यात येणा-या कोणत्या योजनांचा तुम्हला फायदा मिळालेला आहे.

अ. क्र. योजनेचे सविस्तर नांव

| | | |
|---|---|---|
| १. | एकाधिकार आणि आधारभूत किंमत खरेदी योजना. | [ ] |
| २. | विजपंप व ऑईल इंजिन्स वितरण | [ ] |
| ३. | खावटी कर्ज वितरण | [ ] |
| ४. | न्युक्लिअस बजेट योजना | [ ] |
| ५. | इतर[ उल्लेख करा ] [फायदा ज्या योजनेमुळे झाला असेल त्यापुढे ✓ करा. ] | [ ] |

चौक क्र. ४.

२४. अ. गवत खरेदी केंद्र तुमच्या घरापासुन /शेतापासून किती अंतरावर आहे. — अंतर कि. मी. ......[ ] सोईचे[१]/ गैरसोईचे [२]

ब. गवत खरेदी केंद्र गैरसोईचे असल्यास ते कोठे असावे असे तुम्हाला वाटते ? कारण काय.

२५. अ. केंद्रावर गवताचे वजन बरोबर व योग्य केले जाते काय ? — होय [१]/नाही [२]

ब. त्यासाठी तुम्हाला फार वेळ केंद्रावर थांबावे लागते का ?. — होय [१]/ नाही [२]

क. गवताचे पैसे योग्य वत्वरीत दिलेजा जातात काय ? — होय [१]/नाही[२]

ड. गवताची प्रतवारी बरोबर ठरविली जाते काय ?. — होय[१]/नाही[२]

ड. मालाच्या प्रतीवारी प्रमाणे पैसे मिळतात काय? होय [१]/ नाही [२]

ड. गवत खरेदी केंद्रावर अधिकारी/ कर्मचारी वर्गाकडून तुम्हाला वागणूक कशी मिळते. चांगली [१] मध्यम [२] कनिष्ठ [३]

२६. मागील वर्षी ८७-८८ मध्ये गवतापासुन मिळणा-या उत्पन्नाचा उपयोग तुम्ही कोणत्याबाबींवर खर्च केला. ?

| बाब | रक्कम[अंदाजे] |
|---|---|
| १.................. | |
| २.................. | |
| ३.................. | |
| ४.................. | |
| ५.................. | |

२७. गवत एकाधिकार खरेदी योजना तुमच्या फायद्याची आहे असे तुम्हाला वाटते का ? होय[१]/नाही[२]

२८. ही योजना सुरु होण्यापूर्वी व्यापारी गवताला योग्य भाव देत होते काय ? [व्यापारी व महामंडळाच्या व्यवहारातील फरक नमूद करा. लाभधारकांचे विचार घ्यावेत ] होय [१]/नाही[२]

१] भावामध्ये प्रति मे. टन फरक.
२] वजनात प्रति मे. टन फरक.
३] पैसे आगाऊ/वेळेवर/नंतर
४] इतर[खुलासा करा]

२९. ही योजना चालू ठेवावी, असे तुम्हाला वाटते का? कारणे द्या. होय [१]/नाही[२]

१.
२.
३.
४.

३० तुमच्या मते ही योजना कशी
राबविली म्हणजे गवत
उत्पादकांना अधिक
हितावह/फायदेशीर
राहील ?.

३१. गवताच्या विक्रीतून महामंडळ.
शासनाची परस्पर वसुली
केली तर ? तुमचे त्या
विषयी काय मत आहे ?

३२. गवताचे पैसे बँकद्वारा
हप्त्याहप्त्याने व्याजासह
दिल्यावर तुम्हाला
काही अडचण पडेल का ?

सर्वेक्षण अधिकाऱ्यांचे नांव
हुद्दा
सही
दिनांक

## महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ राबवित असलेल्या गवत एकाधिकार खरेदी योजनेचे मूल्यमापन पाहणी १९८७-८८

गवत एकाधिकार खरेदी योजनेत सहभाग असलेल्या कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी प्रश्नावली.

---

### प्रपत्र क्रमांक २.

१] अधिकाऱ्याचे/कर्मचाऱ्याचे नांव व मुख्यालय. :

२] हुद्दा :

३] किती वर्षांपासून आपण या क्षेत्रात/तत्सम क्षेत्रात काम करीत आहेत व कोणत्या पातळीवर[केंद्रावर/ उपविभागीय कार्यालय, विभागीय कार्यालय इत्यादी :

४] तुमचा या योजनेशी सहभाग कसा आहे ? [त्यासंबंधी आपली कामे सांगावी] :

५] तुम्हाला वरील कामाचा अनुभव किती वर्षांचा आहे. ? :

६.] तुम्हाला या संबंधी काही प्रशिक्षण मिळाले आहे काय ?.. :

७] तुमच्या मते या योजनेतील कार्यांशी संबंधित असलेल्या बाबींमध्ये गुणदोष कोणते ? :१] गुण विमांसा-

२] दोष मिमांसा.

८] ही योजना अधिक फलदायी होण्याच्या: दृष्टिने तुमच्या कार्यक्षेत्राशी निगडीत असलेल्या बाबींमध्ये काही फरक तुम्हाला सुचवावासा वाटतो का ?
स्पष्ट करा.
[ कार्यपध्दती, केंद्रव्यवस्था, वरिष्ठअधिकाऱ्यांचे मार्गदर्शन, प्रशिक्षण विक्री खरेदी अधिकार इ. बाबींवर खुलासा करा. ] :

सर्वेक्षण अधिकाऱ्याचे नांव
हुद्दा
सही
दिनांक.